
# अग्निफुले





बागी कर्तारसिंह सरावा



खुदिराम बोस


BVBK-0401567

यतीन मुकर्जी



पुलिन बिहारी दास

# अग्निफुले



शहीद कन्हयालाल दत्त



कु. प्रीतिलता ओहदेदार



रासबिहारी बोस

अस्तमान होणाऱ्या सूर्यनारायणाने
मागे वळून निस्तब्ध पृथ्वीला विचारले,
माझे हे कार्य कोण करणार ?
कोणी उत्तर देत नाही हे पाहून
एका पणतीतील ज्योतिने उत्तर दिले,
' माझ्या शक्तिनुसार मी ते करेन. '

**रविंद्रनाथ टागोर**

## अनुक्रमणिका

* बागी कर्तारसिंह सरावा

* खुदीराम बोस

* यतिन मुकर्जी

* पुलिन बिहारी दास

* शहिद कन्हयालाल दत्त

* कु. प्रीतिलता ओहदेदार

* रासबिहारी बोस

* उपेंद्रनाथ बंदोपाध्याय

BVBK-0401567

९५६७ ३१।१।८४

सन १८९६ च्या फेब्रुवारीमध्ये पंजाबातील सरावा गांवी बागी कर्तारसिंह यांचा जन्म झाला. घरची स्थिती साधारणच होती. बागी कर्तार हे आई-बापांचे एकुलते एक चिरंजीव, लहानपणीच त्यांचे वडील वारले. पण त्यांच्या आजोबांनी त्यांचे पालनपोषण केले. बागी कर्तारसिंहाचे वडील सरदार मालसिंह यांना दोन बंधु होते. एक संयुक्त प्रांतात पोलीस इन्स्पेक्टर व दुसरे ओरिसात जंगल खात्याचे अधिकारी या पदावर होते.

कर्तारसिंह यांचे प्राथमिक शिक्षण सरवा गावी झाले. त्या-नंतर त्यांनी हायस्कूल शिक्षण लुधियाना येथे पुरे केले. विद्यार्थी व इतर लोक यामध्ये कर्तारसिंह प्रेमळ व मनमिळावू स्वभावामुळे अत्यंत प्रिय होते. हायस्कूल शिक्षण संपताच ते कॉलेज शिक्षणासाठी ओरिसामध्ये त्यांच्या चुलत्याकडे राहू लागले.

यावेळी म्हणजे १९१०-११ मध्ये भारतात देशप्रेमाची फार-मोठी लाट उसळली होती, यामध्ये कर्तारसिंहही पडले. कर्तारसिंह यांनी अमेरिकेला जाण्याची इच्छा आपल्या चुलत्यांजवळ प्रगट केली व घरच्या लोकांचा विशेष विरोध न होता ते १९१२ मध्ये अमेरिकेत सॅन्फान्सिस्को येथे गेले.

अमेरिकेत कर्तारसिंह आले, त्यावेळी एमिग्रेशन कायद्यान्वये अमेरिकन अधिकाऱ्यांनी त्यांना प्रवेशबंदी घातली. बंदरामध्ये अमेरिकन अधिकारी आणि कर्तारसिंह यांच्यामध्ये थोडी शाब्दिक चकमकही उडाली.

तो ऑफीसर कर्तारसिंहाना म्हणाला, ' काय हिंदुस्थानात शिक्षण मिळत नाही का ? '

' मिळते की ! नाही म्हणून कोणी आपणाला सांगितले, मी ते घेतलेच आहे. पण उच्च शिक्षण घेण्यासाठी मी येथे आलो आहे.'

' आणि मी जर प्रवेश नाकारला तर ? '

' असे झाले तर फारमोठा अन्याय होईल. '

' विद्यार्थ्यांच्या शिक्षणाआड अडचणी आल्या तर जगात प्रगतीचे मार्गच रोखले जातील. '

कर्तारसिंहाच्या या उत्तराने तो अधिकारी गप्प बसला व त्यांना प्रवेश हुकूम दिला.

कर्तारसिंह यांना अमेरिकेत फार वाईट अनुभव आला. भारतीयांना क्षणोक्षणी डॅम हिंदु, ब्लॅक कुली यासारखे हिणविण्यात येऊ लागलेले पाहून त्यांचा संताप अनावर होऊ लागला, पराधिनता हीच याचे कारण आहे. याची त्यांना खात्री पटली व त्यादृष्टीने त्यांनी आपली पावले उचलण्यास आरंभ केला.

कर्तारसिंहानी अमेरिकेत नोकरीधंद्यासाठी आलेल्यांची संघटना बांधण्यास सुरवात केली. गुप्त सभा होऊ लागल्या. त्यांनी १९१२ मध्ये अनेक सभा घेऊन चळवळीला चालना दिली. एका सभेत नऊ लोकांनी रक्ताने लिहून स्वातंत्र्य चळवळीच्या प्रतिज्ञा घेतल्या. यामध्ये पंजाबमधून निर्वासित झालेले लाला भगवानदार एक होते

या प्रचारासाठी वर्तमानपत्राची आवश्यकता होती म्हणून ' गदर ' नांवाचे वर्तमानपत्र काढण्यात आले. ता. १ नोव्हेंबर, १९१३ ला पहिला अंक प्रसिद्ध झाला. वर्तमानपत्राचा मजकूर तयार करणे, छापणे आणि तो वाटण्याचे काम कर्तारसिंह एकटेच करीत असत.

कर्तारसिंह कवि होते. वर्तमानपत्रासाठी मशीन हाताने फिर-

वताना ते आपल्या कविता म्हणत.

( अरे मना, देशसेवा ही सोपी गोष्ट नाही, गप्पा मारणे सोपे आहे, जे लोक हे व्रत घेतात त्यांना अनेक आपत्तींना तोंड द्यावे लागले. ) अशात-हेची अनेक पदे ते नेहमी म्हणत असत.

कर्तारसिंहानी न्यूयॉर्कच्या विमान कंपनीत प्रवेश मिळविला, तेथे त्यांनी विमानविद्या अवगत करून घेतली. विमान चालविण्याचे शिक्षणही घेतले.

सन १९१४ च्या कामागाटामारू जहाज प्रकरणात कर्तारसिंह हे क्रांतिकारक श्री गुप्ता व अमेरिकन अनार्किस्ट जॅक यासह जपानला विमानाने कोबे ( जपान) येथे बाबा गुरुदत्त सिंह यांना भेटून सल्लामसलती करीत आले होते.

सानफ्रान्सिस्को येथे ज्या ठिकाणी गदर पत्र काढले जात असे तेथे १९१४ मध्ये एका सभेत तिरंगी ध्वज फडकविण्यात येऊन स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व याची सर्वांनी शपथ घेतली.

युरोपात युद्धाचे ढग जमू लागले. तेव्हा कर्तारसिंह निप्पन जहाजाने कोलंबोला आले व तेथून त्यांनी मद्रासमार्गे पंजाबात पाऊल ठेवले.

कर्तारसिंहांनी पंजाबात पाऊल ठेवताच कार्याला जोर आला. त्यातच विष्णू गणेश पिंगळे बनारस कटातील व आजन्म कारावास शिक्षा झालेले विख्यात क्रांतिकारी सचिंद्रनाथ संन्याल व रासबिहारी बोस पंजाबात येऊन दाखल झाले.

कर्तारसिंहांनी तर प्रचाराची धमाल उडवून दिली.

कधी मोगामध्ये गुप्त बैठक व कधी लाहाटे कॉलेजात विद्यार्थी सभा, कधी शस्त्रासाठी कलकत्याला भेट, तर कधी फिरोझपूर लष्करी छावणीत गुप्त प्रचारासाठी प्रवेश, असे नानाविध कार्य त्यांचे

चालूच होते.

देवतास्वरूप भाई परमानंद त्यांना आपला पुत्र मानीत. कर्तार-सिंहाचे वय अवघे २० वर्षांचे, कित्येक ठिकाणी त्यांच्या प्रचाराचा प्रभाव नाही तर ते परमानंदाचा आदेश म्हणून सांगून काम पुरे करुन घेत.

एकदा पैशासाठी एका गावी दरोडा घालण्यासाठी गेले, दरोड्याचे काम सुरू झाले, एका सुंदर युवतीला पाहून या लोका-पैकी एकाला अनावर मोह झाला. अभिलाषेने त्याने त्या स्त्रीचा हात धरण्याचा प्रयत्न केला. कर्तारसिंहानी ते पाहिले, त्यांचा संताप अनावर झाला. ती स्त्री आणि तिची आई घाबरून रडत होत्या. कर्तारांनी आपले पिस्तूल त्या माणसावर उगारले आणि त्या स्त्रियांची पाया पडून माफी मागण्यास सांगितले. त्या इसमाने माफी मागितली. कर्तारसिंह त्या स्त्रियांना उद्देशून म्हणाले, ‘ माँ, क्षमा करा, पैशाच्या लोभाने आम्ही हे करीत नसून, देशाच्या आझादी-करिता करीत आहोत, या पापी माणसाला क्षमा करा. ’

‘ बेटा, धन्य आहे तुझी, या लडकीची शादी जमली आहे. पण पैसा कुठे आहे ?’

‘ माँ, हे घ्या हवे तेवढे. बहेनची शादी उरका, आम्हाला बोलवायला विसरू नका.’

कर्तारसिंहानी आपल्या खिशातील धन त्यांच्यापुढे ठेवले आणि ते सर्वांना घेऊन परतले

पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत त्या स्त्रीने हात जोडून, धन्य माते तुझ्या या पुत्राला माझे शतशः धन्यवाद, त्याच्या प्रयत्नाला यश दे, असे अश्रुपूर्ण नयनानी त्या वृद्ध स्त्रीने त्यांच्याकडे पाहत म्हटले.

कर्तारसिंह, पिंगळे व संन्याल यांनी लष्करातही प्रचाराचा धुमधडाका उडविला. त्याप्रमाणे त्यांनी आग्रा, कानपूर, अलाहाबाद, बनारस, लखनौ, मीरत या ठिकाणच्या लष्करात उठावाची तयारी केली.

ता २१ फेब्रुवारी, १९१५ रोजी सशस्त्र उठाव करण्याचा दिवस रासबिहारी संन्याल व कर्तारसिंह यांनी ठरविला. फिरोझपूर लष्करी छावणीत पन्नास लोक घेऊन कर्तारसिंह गेले. पण दुर्दैवाने कोणा देशद्रोही इसमाने ही वार्ता दिली व लष्करातील सर्व लोकांना त्यापूर्वीच निशस्त्र करण्यात आले होते व कर्तारसिंहाना निराशेने परतावे लागले.

या सर्वांचे परिश्रम वाया जाऊ लागले. पंजाबात अटकेचे सत्र जोरात सुरू झाले, अनेक क्रांतिकारक विचारात पडले.

रासबिहारी बाबू बनारसला आले, कर्तारसिंह, आपले सहकारी जगतसिंह आणि हरिनामसिंह हुंडा या तिघांसह हिंदुस्थानची पश्चिम सरहद्द ओलांडून पहाडी मुलखात आले, पण वाटेत पुन्हा विचार बदलला, देशांत राहूनच प्रयत्न करावयाचा असे ठरवून ते तिघेजण परत फिरले.

पंजाबातील सरगोधा या ठिकाणी एका घरात राहिले असताना एका देशद्रोही माणसाने त्यांना पोलीसांना बोलवून त्यांच्या ताब्यात दिले, या तिघांना हातापायात बेड्या घालून कडेकोट बंदोबस्तात लाहोर स्टेशनवर आणले, तेव्हा त्यांना पाहायला अलोट गर्दी जमली होती. प्रसन्न चेहऱ्याने कर्तारसिंह सर्वांना हात जोडून नमस्कार करीत होते. त्यांच्या त्या विलोभनीय चेहऱ्याकडे पाहून लोक मुग्ध होऊन जात.

तुरूंगात असताना त्यांनी आपल्याबरोबर पकडलेल्या साठ लोकांसह पळून जाण्याचा कट केला, पण कट उघडकीस आला.

सर्वांना बेड्या घालून निरनिराळ्या कोठडीत डांबण्यात आले. कर्तारसिंहाच्या कोठडीत जेलरला गज कापण्याचे साहित्य व सुरा मिळाला.

या सर्वावर खटला भरण्यात आला कर्तारसिंह यांनी आपल्याला काळेपाणी वगैरे सारखी शिक्षा न देता फाशीची शिक्षा द्यावी कारण पुन: याच भारतात जन्म घेऊन ब्रिटिशाबरोबर लढा देता येईल, असा जबाब देताना जज्जाकडे मागणी केली.

कर्तारसिंह आदि लोकांवरील खटल्यात पोलीसांनी कर्तारसिंहाच्या विद्रोही कारवायांची सविस्तर हकिकत कोर्टापुढे ठेवली. हा खटला लाहोर कटाचा खटला म्हणून ओळखला जात असे.

जज्जांनी निकाल देताना २४ व्यक्तींना फाशीची व इतरांना काळेपाणी अश्या सजा दिल्या, अपिलामध्ये २४ पैकी १७ जणांची शिक्षा फाशीऐवजी काळेपाणी करण्यात आली. फाशी शिक्षा देण्यात आले त्यात कर्तारसिंह, विष्णू गणेश पिंगळे, जगतसिंह, हरदामसिंह, बक्षीसिंह, सुरेंद्रसिंह आदि सातजण होते.

जज्जांनी निकाल देताना कर्तारसिंहाबद्दल आपल्या निकालात म्हटले,

He is a youngman no doubt, but certainl he is one of the worst of these conspirators, it is throughly eallus a scoundred proud of his enploits, to whom no mercy, what ever can be or should be shown.

यावरून कर्तारसिंहांच्या कार्याची कल्पना येते.

कर्तारसिंह पिंगळे वगैरेना सन १९१५ च्या १७ नोव्हेंबर रोजी फाशी देण्यात आले, फाशीसमयी त्यांचे वय अवघे २० वर्षाचे होते.

कलकत्त्याच्या एका मोहल्यात क्रांतिकारकांची गुप्त बैठक भरली होती. सन १९०८ च्या एप्रिल महिन्यात कलकत्त्याचे डिस्ट्रिक्ट जज्ज किंग्ज फोर्ड यांनी कांही निरपराध लोकांना क्रांतिकारक समजून कडक शिक्षा ठोठावल्या. या त्यांच्या कृत्यामुळे लोकांत असंतोष निर्माण झाला. क्रांतिकारकांनी किंग्ज फोर्ड यांच्यावर सूड उगविण्याचे ठरविले.

ही वार्ता पोलीसांच्या कानावर जाताच त्यानी किंग्ज फोर्ड यांच्या बंगल्यावर पोलीस पहारा कडक केला व त्यांची बदली मुझफूरपूर या ठिकाणी करण्यात आली. या ठिकाणी पण पोलीस बदोबस्त ठेवण्यात आला होता. किंग्ज फोर्ड यांच्या बंगल्याच्या आवाराचे आसपास कोणासही फिरकू दिले जात नव्हते.

क्रांतिकारकांच्या या बैठकीत किंग्जफोर्ड यांना ठार मारण्याची कामगिरी एका सोळा वर्षाच्या नवजवान तरुणावर सोपविली गेली. या बैठकीत कट प्रमुखाने विचारले,

'खुदीराम, हे काम तुझ्या हातून होईल का ?'

'अर्थात . . .'

'— काम सोपे नाही, पकडला गेलास तर पोलीसांच्या अत्याचाराला तुला तोंड द्यावे लागेल.'

'पोलीस जास्तीत जास्त मृत्यूदंडाशिवाय आणखी कोणती शिक्षा करणार ?'

'तुझ्या या कृत्याबद्दल तुझे नातेवाईक तुझे संबंध तोडून टाकतील.'

'लहानपणीच मी पोरका झालो आहे, रहाता राहिली एक

बहिण पण तिचेही संबध आता तुटलेच आहेत.'

'ठीक तुझ्या मदतीला प्रफुल्ल चाकी याला देत आहोत. सावधगिरी घ्या. ही घ्या पिस्तुले आणि गोळ्या आणि निघा कामगिरीवर.'

नाडाजोलच्या तहशीलदार बाबू त्रैलोक्यनाथ बोस यांचे खुदीराम बोस हे एकुलते एक चिरंजीव. त्रैलोक्यनाथ यांना अनेक अपत्ये झाली पण फक्त एक मुलगा व एक मुलगी एवढीच अपत्ये काय ती जगली. ता. ३ डिसेंबर १८९९ इसवी खुदीराम यांचा जन्म मेदिनीपूर जिल्हृयातील बहुबनी या गांवी झाला. खुदीराम सहा वर्षाचे असतानाच त्याचे मातापिता निवर्तले. त्यानंतर त्यांचे संगोपन त्यांच्या बहिणीने केले. खुदीराम शाळा शिकत असतानाच त्यांचा बंगाली क्रांतिकारकांशी परिचय झाला.

ब्रिटीश सरकार भारतीय जनतेसाठी चांगल्या गोष्टी करीत आहोत असे दाखविण्यासाठी मेदिनीपूरच्या जुन्या तुरूंगात एक प्रदर्शन भरविण्यात आले.

या प्रदर्शनात गुप्त पत्रके वाटण्याचे काम खुदीराम यांनी केले. पत्रके वाटत असताना पोलीसांनी त्याला पकडले पण पोलीसाच्या नाकावर जोराने ठोसा लगविला व ते पळून गेले. गर्दीत पोलीसांना ते पुन्हा सापडले नाहीत.

तेरा एप्रिल १९०८ च्या रात्री आठ वाजता किंग्ज फोर्ड यांच्या बंगल्यातून एक बगी बाहेर पडली. बगीमध्ये दोन व्यक्ती

वसलेल्या होत्या. बंगल्याच्या आसपास झाडीत दडून बसलेल्या दोन युवकांनी बगीच्या रोखाने दोन बाँब फेकले. या बगीतून सरकारी वकील केनेडी यांची पत्नी व मुलगी जात होती. या बाँबमुळे केनेडी यांची मुलगी जागच्या जागी ठार झाली व पत्नी दुसऱ्या दिवशी दवाखान्यात मरण पावली

किंग्ज फोर्ड यांच्या बंगल्या भोवती कडक पहारा असताना हा प्रकार घडावा यामुळे पोलीस खात्यात खळबळ उडाली. अधिकारी विचारात पडले. पोलीस तपासाची चक्रे फिरू लागली. झडत्या, अटक यांचे सत्र सुरू झाले.

खुदीराम व प्रफुल्ल यांनी बाँबफेकीनंतर दोन विरूद्ध दिशेने वाटचाल सुरु केली. खुदीराम यांनी रेल्वे मार्गाने जाण्यास सुरूवात केली व पंचवीस मैल दूर असलेल्या बेनी या गावी ते येवून पोचले. दूरच्या वाटचालीने ते खूपच दमले होते. पाणी पिण्यासाठी ते स्टेशन बाहेरील एका दुकानात गेले. या दुकानदारास खुदीराम यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्या. त्याने खुदीराम यास तेथेच बसवून घेवून पोलीसांना वर्दी दिली. थोड्याच वेळात पोलीस तेथे आले व त्यांनी खुदीराम यास आपल्या ताब्यात घेतले. खुदीराम यांना पोलीसांनी जबर मारहाण केली.

प्रफुल्ल चाकी उलट दिशेने वाटचाल करीत होते. वाटेत समोरून येणाऱ्या पोलीस पथकाशी त्यांची गाठ पडली. प्रफुल्ल यांना हे आपल्यालाच पकडण्यास आले असे वाटले व ते त्यादृष्टीने प्रयत्न करू लागले. पोलीसांनाही संशय येवून त्यांनी प्रफुल्ल यास घेरण्याचा प्रयत्न केला. आता या पोलीसांच्या तडाख्यातून सुटका होणे कठीण असे समजून प्रफुल्ल यांनी खिशातील पिस्तूल काढले व स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली.

प्रफुल्ल चाकी यांनी आत्महत्या करताच त्याचे धड तेथेच टाकून फक्त त्यांचे डोके कापून पुराव्यासाठी पोलीस घेऊन मुझफरपूरला आले.

खुदीराम यांना पोलीसांनी मुझफरपूरला आणले. त्यांच्यावर खुनाचा आरोप ठेवून खटला भरण्यात आला. अगदी कडेकोट बंदोबस्तात त्यांना कोर्टात आणण्यात आले. आपल्याला खटल्यांत भाग घ्यावयाचा नाही असे खुदीराम यांनी कोर्टास सांगितले. परंतु त्यांच्यावतीने कालीदास बसू ॲडव्होकेट यांनी वकीलपत्र घातले.

खटल्याचे काम अनेक महिने रेंगाळत चालले, शेवटी खटला मॅजिस्ट्रेटनी सेशन कमिट केला.

खुदीराम यांच्यावरील खटला रितसर सेशन कोर्टात चालून कोर्टाने त्यांना मनुष्य हत्येबद्दल फांशीची शिक्षा सुनावली.

शिक्षा सांगण्यापूर्वी जज्जांनी खुदीराम यांना ‘ तुम्हाला कांही सांगावयाचे आहे कां ?’ असे विचारले.

‘होय, मला बॉम्ब तयार करण्याबाबतीत सांगावयाचे आहे’ भर कोर्टात ही बॉम्ब करण्याची कला आरोपी सांगेल व त्याचे ज्ञान इतरांना अवगत होईल या भितीने जज्जानी त्यांना परवानगी नाकारली.

या निकालावर खुदीराम यांच्या वकीलानी हायकोर्टात अपील केले पण ते नामंजूर झाले.

अकरा ऑगस्ट १९०८ चा दिवस जवळ येत चालला. जेलरने खुदीराम यांना या दिवसाची कल्पना दिली. त्या दिवशी खुदीराम सकाळी पांच वाजता उठले. थंड पाण्याने स्नान करून गीतेचा एक अध्याय वाचला थोडा वेळ डोळे मिटून प्रार्थना केली, आणि ते वार्डर बरोबर खोलीबाहेर पडले.

अमृत बझार पत्रिकेच्या बारा ऑगस्टच्या अंकात पहिल्या पानावर टळक अक्षरांत ही वार्ता देण्यात आली होती त्यात म्हटले होते की,

ॲडव्होकेट केनेडी यांच्या पत्नी व कन्या यांच्या खुनाबद्दल खुदीराम बोस यांना काल फांशी देण्यात आले. फांशी साठी जात असताना त्यांचा चेहरा प्रसन्न होता, त्यानी वंदे मातरम्‌ची घोषणा करून स्वत: आपल्या मानेभोवती फांस अडकवून घेतला.

खुदीराम यांचे वकील कालीदासबाबू यांनी त्यांच्या अंतिम इच्छेनुसार प्रेत ताब्यात देण्याची मागणी केली होती. मॅजिस्ट्रेटनी ती मान्य केली व कडक पोलीस बंदोबस्तात खुदीराम यांचा पार्थिव देह गंडक नदीतीरावर आणण्यांत आला व तेथे त्यांचा अंत्यविधी उरकण्यात आला.

खुदीराम यांच्या अखेरच्या दर्शनासाठी दुतर्फा रांगा लागल्या होत्या, त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसत होती.

# यतीन मुकर्जी

' तुम्ही यतीन मुकर्जीचे नांव कधी ऐकले आहे का ?' योगी अरविंद यांनी आपल्या शिष्यांना प्रश्न केला. ते पुढे म्हणाले, ' यतीन म्हणजे साक्षात मानवता, सौंदर्य आणि शक्ती यांचा सुंदर मिलाफ मला त्यांच्याशिवाय इतरत्र कोठेही दिसून आला नाही. '

यतीन मुकर्जी हे वाघा यतीन या नांवाने प्रसिद्ध आहेत.तरूण-पणी त्यांची एका वाघाशी झुंज झाली. आणि एकट्याने त्यांनी त्याच्याशी झुंज दिली व नुसत्या सुऱ्याने त्या वाघाला ठार केले.

वाघाबरोबर झालेल्या झटापटीत यतीन गंभीर जखमी झाले. त्यांना कलकत्त्याच्या सरकारी दवाखान्यात आणण्यात आले. त्यांच्या उजव्या पायाचे हाड मोडले होते. डॉक्टर सुरेश सर्वाधिकारी यांनी पाय कापून काढण्याचा निर्णय घेतला. पण यतीननी त्यांना नकार दर्शविला.

वाघाच्या झटापटीत ते गंभीर जखमी झाले होते तरी पण ते दवाखान्यात मित्रांशी अगदी आनंदात गप्पा मारत होते. मधून मधून ते गीतेतील श्लोक म्हणत होते.

दवाखान्यात सहा महिने उपचार घेतल्यानंतर यतीन बरे झाले आणि पूर्वीप्रमाणे ते हिंडु फिरू लागले.

यतीन यांचे जीवन म्हणजे त्या कालात एक पौराणिक कथाच समजली जाऊ लागली.

यतीन मुकर्जी यांचा जन्म सन १८७९ सालच्या जुलै महिन्यात जेसोर येथे झाला. त्यांचे वडील उमेशचंद्र हे प्रकांड पंडीत होते तर मातोश्री शरदशशी या कवयित्री म्हणून ओळखल्या जात होत्या.

यतीन पाच वर्षाचे असतानाच त्यांचे वडील वारले तेव्हा त्यांचे संगोपन त्यांची थोरली बहीण विनोदबाला यांनी केले. त्यांचे मामा कृष्णनगरजवळील कोया येथे रहात होते. तेथे यतीन काही काल राहिले.

एकदा लष्करी इसमाची व यतीन यांची भेट झाली आणि त्याने त्यांना शारीरिक शिक्षणाची आवड निर्माण केली. त्यानेच त्यांना प्रथम स्वातंत्र्य चळवळीची दीक्षा दिली.

यतीन यांनी शिक्षण व बलोपासना यामध्ये एवढी प्रगती केली की, ते शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत प्रिय झाले. ते शरीराने सुदृढ होते तितकेच ते मनाने उदार होते. आजाऱ्यांच्या शुश्रूषा करणे, गरीब विद्यार्थ्यांना सहाय्य करणे, वगैरे तर सतत चालूच असे.

सेंट्रल कॉलेजमध्ये शिकत असताना त्यांना भगिनी निवेदिता यांची कुणीतरी माहिती दिली. त्यांनी निवेदिता यांची भेट घेतली.

यतीन यांच्या व्यक्तीमत्वाची एवढी छाप त्यांच्यावर पडली की, त्यांनी यतीन यांना स्वामी विवेकानंद यांच्याकडे नेले आणि यतीन आणि स्वामीजी यांचा घनिष्ठ संबंध झाला तो अखेरपर्यंत राहिला.

सन १८९९ मध्ये यतीन यांच्या मातोश्री निधन पावल्या.

मातोश्रींच्या निधनानंतर सहा महिने लोटताच यतीन यांनी बंगाल सरकारच्या सचिवालयात स्टेनोग्राफरची नोकरी पत्करली. नोकरी निमित्ताने त्यांना वर्षातील सहा महिने दार्जिलींग येथे रहावे लागे.

यतीन यांचे व्यक्तीमत्व एवढे जबरदस्त होते की, ते ज्या ज्या ठिकाणी जात तेथे तेथे तरुण युवकांचा त्यांच्याभोवती गराडा पडत असे, सचिवालयातही ते सर्वांना प्रिय होते.

सन १९०० साली त्यांनी बहिणीच्या सुचनेवरून इंदुबाला यांच्याशी विवाह केला. त्यांना आशालता, राजेंद्र आणि तजेंद्र अशी तीन अपत्ये झाली.

यतीन सरकारी नोकरीत असतानाच त्यांचा अरविंद घोष यांच्याशी सन १९०३ साली प्रथम परिचय झाला. यतीन यांची अरविंद घोष व जे. एन. बॅनर्जी यांचा परिचय योगेंद्र विद्याभूषण यांच्या घरी झाला. व त्यानंतर थोड्याच दिवसात बॅरिस्टर मित्तर, सतीश मुखर्जी, सुरेंद्रनाथ टागोर, उपाध्याय, ब्रह्मबांधव, सर जगदीशचंद्र बोस, सरलादेवी यांच्याशीही परिचय झाला.

यतीन हे हरिद्वारच्या भोलानाथ गिरी यांचे शिष्य होते. त्यांनीच त्यांना अध्यात्माची दीक्षा दिली. भोलानाथ हे अध्यात्मवादी तितकेच प्रखर स्वातंत्र्यप्रेमी होते. त्यांच्याकडून त्यांना स्वातंत्र्य प्रेरणा मिळाली.

अरविंद घोष यांचा परिचय होण्यापूर्वी पासूनच यतीन युवकांची गुप्त संघटना उभारण्याची तयारी करीत होते. विवेकानंद आणि अरविंद यांच्या परिचयानंतर त्याला रचनात्मक स्वरुप देण्यास मदत झाली.

अरविंद घोष हे क्रांतिकारकांची गुप्त संघटना उभारण्याचे प्रयत्न करीत होते. ब्रिटिश सरकारला या संघटनेची अंधुक कल्पना होती.

सन १९०८ साली माणिकतोळा येथील गुप्त केंद्रावर ब्रिटिश अधिकाऱ्यांनी धाड घालून तेथील दारुगोळा जप्त केला व कित्येक युवकांना अटक केली. अरविंद यांनाही अटक करण्यात आली. अरविंदाचे काम यतीन यांनी चालूच ठेवले होते.

अरविंद वगैरेवर सरकारने खटला भरला. याचा सूड घेण्याचा

यतीन यांनी निश्चय केला. यतीन यांचे एक शिष्य चारुचंद्र बोस यांनी ही कामगिरी आपणहून स्वीकारली. चारुचंद्र यांचा उजवा हात अर्धांगामुळे लुळा पडलेला होता. तेव्हा त्यांना यापासून परावृत्त करण्याचा यतीन यांनी प्रयत्न केला पण त्यांना यश आले नाही.

चारुचंद्र यांनी उजव्या हाताला पिस्तुल बांधले. त्यावर कपडा झाकला व ते एक दिवस अलिपूर न्यायालयात खटला चालू असताना आले. उजवा हात डाव्या हाताने वरून चारुचंद्र यांनी पोलीसांना साहाय्य करणारे आशु विश्वास या सरकारी वकीलावर गोळ्या झाडल्या. आशु विश्वास गोळीबारामुळे मयत पावले. चारु-चंद्र यांच्यावर खटला भरण्यात आला व त्यांना १९ मार्च १९०९ रोजी फाशी देण्यात आले.

या घटनेच्या मागोमाग पोलीस अधिकारी शमसूल आलम याचा यतीन यांचे शिष्य वीरेंद्र दत्त यांनी २४ जानेवारी १९१० रोजी बळी घेतला. दत्त पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांना पोलीसांनी गिरफदार केले.

या क्रांतीकारी युवकांना शस्त्रास्त्रासाठी पैशाची गरज होती. जागोजागी सरकारी खजिन्यावर दरोडे पडू लागले.

यतीन यांचे एक शिष्य ललीत चतर्जी दार्जिलींगमध्ये पोलीसां-च्या वेढ्यात सापडले. पोलीसांच्या अमानुष दडपशाहीमुळे ललित चतर्जी यांनी संघटनेची सर्व माहिती पोलीसांना दिली.

यतीन यांना ता. २७ जानेवारी १९१० रोजी पोलीसांनी अटक केली. यतीन त्यावेळी बंगालच्या गव्हर्नरचे सेक्रेटरीचे सहायक अधिकारी म्हणून काम पहात होते. त्यांच्या घराची झडती घेताच तेथे काही गुप्त पत्रके पोलीस अधिकाऱ्यांना मिळाली.

यतीन यांना तुरुंगात कडेकोट बंदोबस्तात ठेवण्यात आले,

तुरुंगात त्यांचे अनन्वित हाल करण्यात आले. अमानुष मार-हाण करण्यात आली. प्रलोभने दाखविण्यात आली पण यतीन यांनी सर्व गोष्टीना धाडसाने तोंड दिले. यतीन यांना पोलीसांनी अलिपूर तुरुंगात आणले. तेथे त्यांच्यावर खटला भरण्यांत आला हाच खटला हावडा कट खटला म्हणून ओळखला गेला. पंधरा महिन्याच्या कारा-वासानंतर त्यांची मुक्तता झाली.

शमसुल आलम यांच्या हत्येनंतर बंगालमध्ये गंभीर परि-स्थिती निर्माण झाली, यतीन यांची तुरुंगातून मुक्तता होताच त्यांनी विस्कटलेली घडी पुन्हा बसविण्याचा प्रयत्न सुरू केला.

यतीन यांचे सहकारी स्वामी प्रज्ञानंद, हेमेंद्र, पुरणदास, मोतीलाल रॉय, शशीभूषण रॉय, चौधरी वगैरे नेत्यांनी पुन्हा संघटना उभारण्याचा जोराने प्रयत्न केला.

याचवेळी जागतिक युद्धाचे ढग जमू लागले. यतीन यांनी कलकत्ता गुप्त केंद्राचा कारभार आपले विश्वासू सहकारी अतुल्य घोष यांच्यावर सोपवून ते जेसोरला आले व आपल्या प्रपंचात पुन्हा लक्ष घातले असल्याचे भासविले.

जेसोरला यतीन जिल्हा बोर्डाची व सरकारी कामाचे कंत्राट-दार म्हणून ते काम करू लागले जेसोर खेरीज आणखी तीन ठिकाणी आपल्या शाखा उघडल्या.

यतीन क्रांतिकारकांची संघटना या खोट्या भुलावणीखाली करीत असल्याचे त्यांच्या सहकाऱ्यांना माहीत होते. व्यापाराच्या नावाखाली ते सर्व प्रांतभर हिंडू लागले. सरकारला यतीन यांचे हे स्वरूप कळण्यास बराच काळ लागला

यतीन यांचे सहकाऱ्यांनी पण याचप्रमाणे उद्योग सुरू केले अमरेंद्र चतर्जी व रामू मुजूमदार यांनी हॅरिसन रोडवर कापड दुकान

सुरू केले. हरिश आणि कंपनी या नावाने हरी चक्रवर्ती यांनी दलालीचे दुकान सुरू केले. सुरेश मुजुमदार यांचा गौरांग प्रेस कॉलेज स्क्वेअर भागात सुरू झाला. याच ठिकाणी पुढे आनंदबझार पत्रिका, हिंदुस्थान स्टॅन्डर्ड, साप्ताहिक देश छापण्यात येऊ लागले. विजय रॉय यांनी आयुर्वेद दवाखाना काढला तर विजय चक्रवर्ती यांचे चक्रधरपूर येथे कापड दुकान सुरू झाले.

यतीन यांच्या सूचनेवरून बालासोर ( ओरिसा ) येथे शैलेश बोस यांनी घड्याळे व सायकल व्यापाराचे दुकान सुरू केले.

अशात-हेने यतीन यांनी जागोजागी क्रांतिकारकांच्या संघटना उभारण्यासाठी आपल्या सहकाऱ्यांना पाठविले.

यतीन नीलरत्न धर यांच्या घरी झोपण्यास जात, तेथे त्यांचा मेघनाथ सहा, ज्ञानघोष, डॉ. सत्येन बोस यांचा प्रथम परिचय झाला. यतीन यांचे ते पुढे साहाय्यक बनले.

सन १९१३ साली साऱ्या जगावर युद्धाची छाया पडली.

जागतिक युद्ध सुरू झाले तर आपण सशस्त्र उठाव कसा करावयाचा याची एक योजना यतीन यांनी तयार केली व ही योजना आपल्या सहकाऱ्यांना त्यांनी गुप्त बैठक भरवून सांगितली.

कलकत्त्याच्या रोडा कंपनीवर सन १९१४ च्या ऑगस्टमध्ये या क्रांतिकारकांनी हल्ला केला व तेथील माउंजर या जर्मन बनावटीचा मोठ्या प्रमाणावर साठा व दारूगोळा हस्तगत केला व तो सर्व सहकाऱ्यांना वाटून दिला

परदेशातून सहाय्य मिळविण्यासाठी यतीन यांनी योजना आखली. पंजाबमध्ये सरदार किशनसिंह व अजितसिंह यांचेही प्रयत्न चालूच होते. त्यांनी यतीन यांच्या योजनेचे स्वागत केले.

लाला हरदयाळ त्यावेळी अमेरिकेत होते. ते व पं रामचंद्र

बर्कतुल्ला खान, भाई परमानंद, पांडूरंग खानखोजे, काशीराम, बाबा सोहनसिंग भाकना यांनी सानफ्रान्सिस्कोमध्ये युगांतर नावाची गुप्त संघटना स्थापन केली. व ' गदर ' या नावाने वृत्तपत्र सुरु केले.

याचवेळी लंडन, झुरिच व बर्लिन येथे परांजपे, सुखटणकर, डॉ. धिरेंद्र सरकार, सिद्दीकी, डॉ. ज्ञानदास गुप्त, सोवेन, विरेंद्र चटोपाध्याय, वीर सावरकर, मदनलाल धिंग्रा, शामजी कृष्णवर्मा, मॅडम कामा यांनी आपले प्रयत्न सुरू केले होते.

वीरेंद्र चटोपाध्याय यांचे जर्मन परराष्ट्र वकीलाशी घनिष्ट संबंध होते. लाला हरदयाळ हे बर्लिनला येताच उभयतांनी जर्मनी-कडून ब्रिटिशांविरूद्ध उठावासाठी शस्त्रास्त्रे, दारूगोळा वगैरे साहित्य पुरविण्याचे आश्वासन मिळविले. या प्रयत्नांची सर्व हकीगत एच. डब्लू. विल्सन यांनी आपल्या पुस्तकात दिली आहे.

यतीन व रासबिहारी यांचा स्नेह होता. तुरूंगातून सुटका होताच यतीन यांनी रासबिहारी यांची भेट घेतली. रासबिहारी हे प्रथमपासूनच यतीन यांना सहकार्य देत होते.

डॉ. यदू गोपाळ मुकर्जी यांनी आपल्या आत्मचरित्रात या उभयतांच्या कार्याबद्दल गौरवपूर्ण वर्णन दिले आहे.

एकदा यतीन व रासबिहारी गुप्त वाटाघाटी करीत असताना यतीन यांनी बोस यांना विचारले,

' दादा, फोर्ट विल्यमची जबाबदारी कोण स्विकारणार ?'

' ती जबाबदारी मी स्विकारतो. ' बोस यांनी यतीनना चटकन उत्तर दिले.

रासबिहारी फोर्ट विल्यम किल्ल्यात असलेले लष्करी तुकडीचे प्रमुख गेंडासिंग यांच्याकडे गेले व त्यांना उठावाची योजना सांगि-

तली व उठाव होताच किल्ल्यातील लष्कराने त्याला साथ देण्याचे ठरले.

जागतिक युद्ध सुरु होताच उठावाची तयारी झाली. ता. २५ फेब्रुवारी १९१५ रोजी सार्वत्रिक उठावाचा दिवस नक्की झाला पण कृपालसिंह या पक्षातील एका पक्षभेदाच्या विश्वासघातकी कारवाया-मुळे योजना फिसकटली.

भारतात योजना फिसकटली तरी परदेशात उठाव झालेच. सिंगापूरमध्ये पायदळाच्या पाचव्या पलटणीने मलाया स्टेट गाईडस्च्या एक हजार सैनिकांसह सिंगापूरच्या किल्ल्याला वेढा दिला. हा वेढा सहा दिवस होता. परंतु दरम्यान भारतातून सैनिक मदत न आल्याने या पलटणीला शस्त्रे खाली ठेवावी लागली. ही सारी योजना जर्मनीच्या साहाय्याने अमेरिकेत तयार करण्यात आली होती.

यतीन यांचे एक सहकारी सत्येन सेन हे जपानमध्ये होते. त्यांनी चीनचे क्रांतिकारी नेते डॉ. सन्यत सेन यांची भेट घेतली. सन्यत सेन यांनी सर्व सहाय्य देण्याचे मान्य केले. सन्यत सेन हे प्रथमपासूनच भारताच्या स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते सेन जपानहून अमेरिकेस गेले. व ते कर्तारसिंग सरावा व पिंगळे यांच्यासह भारतात परत आले.

सेन यांनी अमेरिकेहून चार हजार, गदर पार्टीचे अनुयायी मदतीसाठी भारताकडे यावयास निघाले असल्याचे यतीन यांना सांगितले. तसेच शस्त्रास्त्रे व दारूगोळा भरलेले एक जहाज मदतीला येत असल्याचे सांगितले या भरवंशावर यतीन यांनी शिल्लक असलेला दारुगोळा व शस्त्रे उत्तर प्रांतातील सर्व गदरपक्षीय सहकार्यांना वाटून टाकला.

भारत बर्लिन कमेटीला सर्व साह्य देण्याबद्दल अमेरिका व युरोपमधील आपल्या प्रतिनिधींना जर्मन सरकारने सूचना पूर्वीच दिल्या होत्या.

सन १९१५ च्या मार्चमध्ये यतीन मुकर्जीचे सहकारी लाहिडी यांनी मेवारिक हे जर्मन जहाज सानफ्रान्सिस्कोहून शस्त्रे व दारूगोळा घेऊन इकडे यावयास निघाल्याचे यतीन यांना कळविले. या जहाजा-बरोबर झेनी लारसेन व हेन्‍री एस ही जहाजे पण इकडे येणार असल्याचे सांगितले.

या जहाजांपैकी एका जहाजातील माल नोआखाली मधील हरिया येथे व दुसरे सुंदरबनमधील रायमंगल येथे उतरून घेण्याचे ठरले. बिपीन गांगुली व एम. एन. रॉय यांच्याकडे हे काम सोप-विण्यात आले. एका ठरलेल्या तारखेला क्रांतिकारकांचे सैन्य कलकत्ता शहरात प्रवेश करील त्याचवेळी भारतीय लष्कर कल-कत्त्याचा ताबा घेण्याचे ठरले. भुपति मुजूमदार व फणी चक्रवर्ती यांच्याकडे डायनामाईट व स्फोटक शस्त्राची कामगिरी देण्यात आली. तिसरे जहाज उडिसामधील बालासोर येथे थांबविण्याचे ठरले.

या जहाजावरील शस्त्रास्त्रे उतरून घेण्याचे काम यतीन यांनी स्वतःकडे घेतले.

याचवेळी बंगाल-मद्रास जोडणारा मार्ग उध्वस्त करण्याचे काम यतीन यांनी करण्याचे ठरविले. नागपूर-कलकत्ता मार्ग उख-डण्याचे काम भोला चतर्जी व यतीश चक्रवर्ती यांच्यावर सोपविण्यात आले.

यावेळी भारतात ब्रिटिशांचे अवघे बारा हजार लष्कर होते.

क्रांतिकारकांची गुप्त बैठक कलकत्त्यात भरली होती. या

लोकांवर नजर ठेवणाऱ्या एका गुप्त पोलीसाने दाराआड उभा राहून काय चालले आहे ते पहात असताना त्याची सावली खिडकीच्या तावदानावर पडली. यतीन योजना समजावून देत होते, शेजारी बसलेल्या चित्तप्रिय यांनी सावलीच्या रोखाने पिस्तूल झाडले. तो गुप्त पोलीस खाली कोसळला व मरण पावला.

बैठक बरखास्त झाली व सर्वजण निघून गेले.

मेवरिक जहाज भारताच्या किनाऱ्याला आल्याची वार्ता यतीन यांना समजली.

यतीन बालासोरकडे जाण्यास निघाले, वाटेत त्यांना स्वामी रामकृष्ण परमहंस यांच्या शिष्या शरदमणी आता यात्रेला जात असल्याचे समजले. यतीन यांनी त्यांचे दर्शन घेतले व आशीर्वाद मागितला.

यतीन तेथून निघून जाताच माताजींना यतीनबरोबर काय झाले म्हणून कुणीतरी त्यांना विचारले. तेव्हा यतीनमध्ये मला एक प्रखर ज्योतीचे दर्शन घडले असे त्यांनी उत्तर दिले.

यतीन मयुरभंजच्या जंगलात आले व तेथे जहाजाची वाट पाहू लागले.

यतीन या भागात साधूबाबा म्हणून ओळखले जात असत. यतीन या भागातील लोकांना सर्वप्रकारचे साह्य देत त्यामुळे लोकांची त्यांच्यावर मोठी भक्ती होती.

स्थानिक लोक त्यांना साधूबाबा म्हणत असत. जंगलात त्यांनी मध्यभागी एक छोटीशी झोपडी बांधली होती त्यामध्ये यतीन रहात असत. आजाऱ्यांना औषधे देणे, द्रव्यसाह्य करणे व शिक्षणाचे काम नित्य चालू असे. यतीन यांनी निरनिराळ्या ठिकाणी नियुक्त केलेले त्यांचे सहकारी काप्लीपोड येथे ( आश्रमात ) नित्य येत व

सर्व हकीगती यतीन यांना सांगत असत.

आशियाई देशात सहा महिने हिंडून एम. एन. रॉय हे बटेव्हिया-मध्ये जर्मन प्रतिनिधी व्हॉन हेलफरिच यांची भेट घेऊन काप्लीपोड येथे यतीन यांच्या भेटीस आले. रॉय यांनी पौन्ड नाण्यानी भरलेली थैली व एक स्वतंत्र भारताचे मानचित्र यतीन यांना अर्पण केले व जर्मन जहाज भारताच्या किनाऱ्याच्या रोखाने येत असल्याचे सांगितले.

सर्व लोक उत्सुकतेने जहाजाची वाट पाहू लागले.

मेवारिक जहाज ठरलेल्या कार्यक्रमानुसार सानफ्रान्सिस्कोहून निघाले. वाटेत त्याच्याबरोबर असलेले लारसेन हे जहाज अमेरिकन सरकारने पकडले.

अमेरिकेतील गदर पार्टीमध्ये एक गुप्तचर खात्याचा माणूस होता. त्याने भारतात चाललेल्या या कारवायांची माहिती फ्रेंच गुप्तचर खात्याला दिली. ती बातमी ब्रिटिश सरकारला देण्यात आली.

यतीन यांना पकडण्यासाठी गुप्तचर खाते प्रयत्न करू लागले. तिकडे मेवारिक जहाजाचा पाठलाग सुरु झाला. आता जहाजाने गुप्त कागदपत्र व दारूगोळा समुद्रात फेकून दिला व ते सिंगापूरच्या रोखाने निघाले. सिंगापूरमध्ये ते जहाज पकडण्यात आले. जहाज पकडल्याची बातमी यतीन यांनी वृत्तपत्रात वाचली.

मेवारिकचा प्रयत्न फसला म्हणून यतीन निराश झाले नाहीत यतीन यांनी पफी चक्रवर्ती व एम. एन. रॉय यांना बटेव्हियामध्ये पाठविले. हे उभयता शोधायला गेले व तेथे जर्मन वकिलाला भेटले व पुन्हा दोन जहाजे पाठविण्याची सूचना केली. जर्मन वकिलाने ती मान्य केली. हे दोघे सिंगापूरला अचानक पकडले गेले. रासबिहारी

सिंगापूरहून निसटले व जपानला गेले.

पोलील खात्याने यतीन व त्यांचे सहकारी यांना पकडण्याचा प्रयत्न सुरू केला.

पोलीस अधिकारी डी. जी. डनहॅम, पोलीस कमिशनर चार्लस टेवार्ट, सहाय्यक कमिशनर एल. एन. बर्ड असे तिघेजण १९१५ च्या चार सप्टेंबरला बालासोरला आले व त्यांनी युनिव्हर्सल एम्पोरियम या दुकानची झडती घेतली. तेथे त्यांना काप्तीपोड नावाची चिठ्ठी मिळाली. या अधिकाऱ्यांना शंका आली.

हे पोलीस अधिकारी बालासोरचे कलेक्टर आर. जी. फिलरी, सार्जन्ट रुदरफोर्ड, बिहार ओरिसाचे डी. आय. जी. कोलंड यांच्या-सह काप्लीपोड जंगलाकडे जाण्यास निघाले.

चार्लस टेगार्ट यांच्या सूचनेवरुन एक पोलीस पथकही बरोबर घेण्यात आले.

यतीन यांना त्यांच्या सहकाऱ्याने ही माहिती कळविली. यतीन यांनी याला तोंड कसे द्यावयाचे यावर विचार केला व आश्रमातील चित्तप्रिय व मनोरंजन यांना सावधगिरीची सूचना दिली.

यतीन आश्रमातून बाहेर पडले व बारा मैल दूर असलेल्या ज्योतिष व निरेन यांना सूचना देण्यासाठी तिकडे निघाले

या सर्वांची भेट झाली. या सहकाऱ्यांनी यतीन यांना दूर निघून जाण्याची सूचना केली. पण सहकाऱ्यांना सोडून जाण्यास यतीन यांनी नकार दिला.

काप्तीपोड जंगलाला पोलीसांनी वेढा दिला. त्यातून यतीन निसटले व आठ सप्टेंबर रोजी मणींद्र यांची भेट घेतली.

यतीन यांना जिवंत अगर मृत पकडून देणाऱ्यास पोलीसांनी बक्षिस जाहीर केले असल्याची हकिगत मणिंद्र यांनी यतीन यांस

सांगितली.

यतीन यांनी मणिंद्र यांस हत्यारे व पैसे दिले व ते परत आपल्या पूर्वस्थळी आले.

दुसऱ्या दिवशी पहाटे यतीन व त्यांचे सहकारी बालासोर भागातील बालम नदी ओलांडण्यासाठी किनाऱ्यावर आले. पाऊस पडत असल्यामुळे नावाडी त्यांना पलिकडे नेण्यास तयार होईनात.

या नावाड्यांना हे डाकू असावेत असा संशय आला त्यांनी आरडाओरड सुरु केली. लोक जमू लागले व बक्षिसाच्या आशेने ते यतीन वगैरेना पकडण्याचा विचार करू लागले.

आपण डाकू नसल्याचे यतीन यांनी परोपरीने सांगण्याचा प्रयत्न केला पण लोक ऐकायला तयार होईनात. लोक त्यांना घेरण्याचा प्रयत्न करु लागले. दोघे खेडूत धाडसाने पुढे आले पण या लोकांनी पिस्तुल रोखताच मागे सटकले.

यतीन व त्याचे सहकारी तेथून निसटले व ते जंगलात दुसरी-कडे गेले. लोकांनी त्यांचा पाठलाग सुरु केला. एका गावाहून दुसऱ्या असा त्यांचा क्रम सुरु झाला. लोकांचा जमाव पण त्यांचा पाठलाग करू लागले. लोकांनी त्यांना गाठले पण पुढे येण्याचे कोणास धाडस होईना. त्यात गडबड करणाऱ्या दोन खेडूतावर मनोरंजनने पिस्तुल झाडले. ते दोघे जागच्या जागी ठार झाले.

अशा स्थितीत यतीन आपल्या सहकाऱ्यांसह मयुरभंजला पोहोचले. एका दुकानात त्यांनी मिठाई घेतली. पैसे देण्याचे पण दुकानदाराकडे मोड मिळेना तेव्हा यतीनने दहा रूपयाची नोट त्याला देऊन टाकली, दुकानदाराला संशय आला. यतीन तेथून निसटले तोपर्यंत लोकांचा जमाव तेथे आला. पोलीसांना ही वार्ता समजली. यतीन नदी ओलांडून दाट जंगलात घुसले

यतीन यांचे सहकारी नीरेन दगदगीने आजारी होता. यतीन यांनी जंगलात एका पहाडांचा आश्रय घेण्याचे ठरविले. टेहळणी करण्याचे काम चित्तप्रिय व आणखी दोघे याच्यावर सोपविले गेले.

पोलीसांनी जंगलाला वेढा दिल्याची चित्तप्रिय याने यतीनना सूचना दिली.

मेजर फ्रीथ, सार्जन्ट रुदरफोर्ड, चार्लस टेगार्ट, बर्ड रोलंड, बेनहॅम, खुदाबक्ष व खासनवीस या पोलीस अधिकाऱ्यांची चारी बाजूने पोलीस पथके पुढे सरकू लागली.

एका माणसाने उंच झाडावरुन फडके हालवून खुण केली. मनोरंजनने ते पाहिले व त्याच्यावर गोळी झाडली. तो गोळी लागून खाली पडला.

फरारी क्रांतिकारक जवळच असल्याचे पोलीस अधिकाऱ्यांचे ध्यानात आले. पोलीस हवेत गोळीबार करीत पुढे सरकू लागले. अधिकारी पोलीसांना पुढे जाण्याचा हुकूम करू लागले. चार तास सतत गोळीबार चालू होता.

यतीनला त्यांचे सहकारी ज्योतिष म्हणाले, ' दादा, गोळ्या संपत आल्या. '

यतीनने एक गोळ्यांची थैली त्याच्याकडे फेकली. थैली सोडण्याची ज्योतिष खटपट करू लागले. थैलीचे कुलूप लौकर निघेना.

पोलीस अधिकारी टेगार्ट याने पोलीसांना जमिनीवरून सरपटत पुढे जाण्याची आज्ञा केली. पोलीस पुढे सरकू लागले

एक शिपाई झाडावर चढला. त्याने तेथून गोळी झाडली व त्यात चित्तप्रियचा बळी पडला दुसरी गोळी यतीनच्या मांडीत घुसली.

यतीन यांच्या मांडीतून रक्त वाहू लागले, पण त्यांनी गोळीबार सुरुच ठेवला होता.

चित्तप्रिय खाली कोसळलेले पहाताच त्यांचा देह मांडीवर घेऊन यतीन गोळ्या झाडत होते, चित्तप्रिय याची नजर यतीन यांच्याकडे होती. त्याला बोलता येत नव्हते. त्याने यतीनला दूर निघून जाण्याची सूचना केली. पण यतीननी मान्य केले नाही. चित्तप्रियचे डोळे पाणावले होते. यतीन यांच्या हातात हात देत चित्तप्रिय यांनी अखेरचा श्वास सोडला.

गोळ्यांचा साठा संपत आला.

राहिलेले चौघेजण आपल्या परीने प्रतिकार करीतच होते.

यतीन यांच्या काखेत व पोटात गोळ्या लागल्या. सर्वांग रक्ताने माखले गेले. रक्ताने सर्व कपडे भिजून गेले. जमिनीवर जागोजागी रक्त सांडले होते.

वीरेन, ज्योतिष व मनोरंजन पोलीसांच्या गोळ्यांनी जखमी झाले होते. त्यांना गोळ्या लागलेल्या पाहून यतीन यांनी धोतर फाडून त्यांना पट्ट्या बांधल्या.

आपल्या नेत्याला एवढ्या जखमा झाल्या असताना त्याची पर्वा न करता दुसऱ्यासाठी धडपडत असल्याचे पाहून या चौघांच्या डोळ्यात पाणी आले.

' दादा, आमची काळजी करू नका. तुम्ही दूर निघून जा. तुमची सर्वांना गरज आहे. आमची एवढी विनंती मान्य करा. '

मनोरंजन व इतर यतीनना म्हणाले.

' तुम्हाला सोडून मी जाणार नाही. माझे काही होवो, माणसाला केव्हा तरी मरण येणारच. ' यतीननी उत्तर दिले.

यतीन व त्यांचे सहकारी यांच्याभोवती पोलीसांचा वेढा

पडला. हे हळूहळू पुढे सरकत होते. झाडांचा आश्रय घेत पोलीस अधिकारी गोळ्या झाडत पुढे सरकत होते.

यतीन मधून मधून गोळ्या झाडत होते. दारूगोळा संपला होता.

पोलीस पुढे सरकले. रक्ताच्या थारोळ्यात मनोरंजन, विरेन व ज्योतिष पडले होते. चित्तप्रियाचे डोके मांडीवर घेऊन यतीन प्रतिकाराच्या पवित्र्यात बसले होते.

पोलीसांनी यतीन यांना पकडले व हातातील पिस्तुल काढून घेतले.

पोलीस अधिकाऱ्यांनी हॅट उचलून यतीनला अभिवादन केले.

यतीनला झालेल्या भयंकर जखमा पाहून पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांना बालासोरच्या सरकारी दवाखान्यात ताबडतोब हलविले.

यतीन यांना नेत असताना ते आपले जायबंदी झालेले सहकारी मनोरंजन, विरेंद्र आणि ज्योतिष यांना म्हणाले,

' माझ्या लाडक्या सहकाऱ्यांनो, तुम्हाला सोडून जाण्याचे माझ्या जीवावर आले आहे. स्वतंत्र असतो तर एक इंचभर मी येथून दूर झालो नसतो तुम्हाला मागे टाकून मी जात आहे. साऱ्या लोकांना सांगा, आम्ही डाकू नाही देश स्वतंत्र करणारी आम्ही भारतमातेची लेकरे आहोत. याच ध्येयाने आम्ही वेडे झालो आहोत आमचे अपुरे राहिलेले कार्य आमचे वारसदार पुरे करतील '

यतीन यांना मुर्च्छा आली. पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांना शुद्धिवर आणण्याचे प्रयत्न केले.

थोड्या वेळाने यतीन शुद्धिवर आले. आपल्या ज्योतिष, मनोरंजन आणि विरेन्द्र यांच्या जवळ नेण्याची त्यांनी पोलीसांना

विनंती केली. चित्तप्रियच्या चेहऱ्यावर हात फिरवित यतीन म्हणाले, ' क्षमा कर. '

यतीन यांचे हृदय भरून आले. डोळ्यांतून धारा वाहात होत्या.

ज्योतिष, मनोरंजन आणि विरेन्द्र यांच्या गालावर हात फिरवून त्यांनी त्यांची चुंबने घेतली. आकाशाकडे दृष्टी लावून त्यांनी नमस्कार केला.

' परमेश्वरा, माझे कार्य पुरे करण्याची शक्ती माझ्या वारसदारांना दे.,

यतीन यांना पुन्हा मुर्च्छा आली. पोलीसांनी यतीनना बालासोरच्या दवाखान्याकडे हलविले.

बालासोरच्या दवाखान्यात ऑपरेशनपूर्वी यतीन यांचा जबाब घेण्यात आला.

' या सर्व घटनांची जबाबदारी आपल्यावर आहे. बाकी सारेजण निर्दोष आहेत. त्या सर्वांना सोडून देण्यात यावे. ' असा जबाब यतीन यांनी दिला.

यतीन यांच्यावरील शस्त्रक्रिया यशस्वी झाली.

१० सप्टेंबरला सकाळी किल्बी यतीन यांच्या बिछान्याजवळ बसले होते.

यतीननी एकदम पोटाच्या बांधलेल्या पट्ट्या ताकद लावून फाडून काढल्या आणि जखमांचे टाके तटातट तोडले.

टाके तुटल्यामुळे जखमेतून रक्ताच्या धारा वाहू लागल्या. पलंगावरील गादी रक्ताने भिजून गेली. जमिनीवर रक्ताचे थारोळे झाले.

यतीन किल्बी यांच्याकडे पहात म्हणाले,

' किल्बी, अजून माझ्या शरीरात इतके रक्त राहिले होते. मी भाग्यवान आहे, माझ्या रक्ताचा प्रत्येक थेंब मातृभूमीच्या सेवेसाठी खर्च पडत आहे '

डॉक्टरांची धावपळ सुरु झाली, चार्लस टेगार्ड यतीनला फार पूर्वीपासून ओळखत होता. टेगार्ड यतीनच्या बिछान्याजवळ आले, ' यतीन, मला तुमच्या सेवेची संधी द्याल का ?'

' टेगार्ड, मी तुमचा आभारी आहे. सर्व काही संपले आहे.'

यतीनची थोरली बहिण त्यांना एकदा म्हणाली होती की, ' यतीन सिंह पिंजऱ्यात सापडल्याचे वृत्त माझ्या कानावर येता कामा नये. '

यतीनला पाहण्यासाठी दवाखान्याबाहेर लोकांची गर्दी झाली होती. पोलीसांनी दवाखान्यात येण्यास मनाई केली होती.

यतीन आता अगदी काही क्षणांचे सोबती राहिले होते. डॉक्टरी उपचारांचा आता उपयोग नव्हता. यतीन यांच्या बिछान्याजवळ पोलीस अधिकारी उभे होते. सर्वांचे डोळे भरून आले होते.

यतीन यांनी हात जोडून सर्वांना अखेरचा नमस्कार केला. क्षणात त्यांची प्राणज्योत मालवली.

यतीन यांचा गौरव करताना पोलीस अधिकारी चार्लस् टेगार्ट म्हणाला, ' एका महान भारतीय पुत्राची भेट झाली हे माझे भाग्य. सेवक या नात्याने मला माझे कर्तव्य करावे लागले.'

यतीन यांच्या निधनाची वार्ता पसरताच लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्यांच्या अखेरच्या दर्शनासाठी दवाखान्याकडे लोटल्या.

यतीन यांच्या निधनाची वार्ता देशभर पसरली. लोकांनी हळहळ व्यक्त केली.

बॅरिस्टर सी. आर. दास, रविंद्रनाथ टागोर यासारख्या थोर

व्यक्तींनी यतीन यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली.

बंगाल प्रांतात कित्येक वर्षे कवी आणि चारण यतीन यांच्या शौर्याच्या गाथा वर्णन करणारी काव्ये गात असत.

यतीन यांचे सहकारी मनोरंजन आणि विरेन यांना फाशी देण्यात आले. ज्योतिष यांना आजन्म कारावासाची सजा झाली. त्यांना तुरूंगात वेड लागले. तुरुंगातच त्यांचा अंत झाला.

यतीन यांच्या शौर्यगाथेची इथेच समाप्ती झाली.

अनुशीलन समिती या क्रांतिकारी संस्थेचे संस्थापक सदस्य व प्रख्यात क्रांतिकारक पुलिन बिहारी दास यांची जन्मशताब्दी डाक्का येथे साजरी करण्यात आली. डाक्क्याप्रमाणेच कलकत्याच्या वंगीय व्यायाम समितीतर्फे साजरी करण्यात आली. डाक्क्याच्या समारंभास कलकत्यातील अनेक क्रांतिकारक हजर होते.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मृतवत झालेल्या भारतीयांमध्ये ऋषि बंकिमचंद यांच्या आनंदमठ आणि वंदेमातरमने चैतन्य निर्माण केले. भारतात ठिकठिकाणी युवकांच्या स्वातंत्र्य आणि समानता प्राप्तीसाठी संघटना निर्माण झाल्या.

बंगालमध्ये चळवळीची लाट उसळताच त्यावेळेचे गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन यांनी राज्यकारभाराच्या सोईसाठी बंगालची फाळणी करण्याचा हुकूम काढला

लॉर्ड कर्झन यांच्या या निर्णयाविरूद्ध सुरेंद्रनाथ बानर्जी, बिपिनचंद्र पाल या सारख्यांनी आवाज उठविला व स्वदेशीची मोहीम हातीं घेतली. सर्वत्र परदेशी मालावर बहिष्कार व निरोधने होऊ लागली चळवळीचा वाढता जोर पाहून कर्झन यांनी सरकार चळवळीला भिऊन फाळणीचा निर्णय बदलणार नाही हे भारतीयांनी लक्षात ठेवावे, अशी धमकी दिली.

कर्झन यांच्या या धमकीला प्रत्युत्तर म्हणून बंगालचे प्रख्यात कायदेपंडित व क्रांतिकारक बॅ. प्रेमनाथ मित्र व पुलिन बिहारी दास यांनी कलकत्यात २४ मार्च १९०२ या दिवशी अनुशीलन समिती या क्रांतिकारकांची संघटना स्थापन केली.

अनुशीलन समितीची कलकत्यास स्थापन झाली. त्यावेळी

डाक्का येथे वीरश्री उत्सव डाक्क्याच्या जगन्नाथ महाविद्यालयाच्या आवारात पुलिन बिहारीदास यांनी बॅ. मित्रा आणि बिपिनचंद्र पाल यांच्या सहाय्याने साजरा केला. या समारंभात युवकांना उद्देशून भाषण करताना बॅ. मित्रा म्हणाले, ' स्वदेशीची घोषणा व बहिष्कार एवढयाने आपला कार्यभाग होणार नाही. त्यासाठी या भूमीवरील सत्ता परकियांकडून हिसकावून घेतली पाहिजे नाहीतर मरण पत्करले पाहिजे. '

या सभेत कोणीतरी उठून ' हे घडणे अशक्य आहे ' असे उद्गार काढले. हे ऐकून बॅ. मित्रा खवळून उठले व म्हणाले. ' आमचा हा अखेरचा निर्णय आहे. आम्ही शस्त्रे उपसली आहेत. एक तर शत्रुचे रक्त नाहीतर आमचे स्वतःचे रक्त चाखल्याशिवाय ती परत म्यान केली जाणार नाहीत. '

बॅ. मित्र यांचे हे उद्गार ऐकताच बरेच युवक भीतीने बैठक सोडून निघून गेले.

याच सभेत डाक्का अनुशीलन समितीची स्थापना करण्यात आली. कलकत्ता समितीचे अध्यक्ष म्हणून आनंद चक्रवर्ती या कायदे पंडितांची नियुक्ती करण्यात आली.

अनुशीलन समिती ही राजकीय कार्य करीत होती तरी तिला राजकीय संघटना म्हणून काम करावयाचे नव्हते.

अनुशीलन समितीमध्ये युवकांना राजकारणाबरोबर सांघिक खेळ, लाठी, व तलवार हे प्रामुख्याने वापरण्याचे शास्त्रीय शिक्षण, शास्त्राचा वापर व युवक संघटना हे प्रामुख्याने शिकवले जाई. समितीच्या ज्या युवकांनी कला व संस्कृती शिक्षणाचे वर्गही चालविले अशा तऱ्हेने पुलिन बिहारी यांनी शिस्तबद्ध तरुण सेना निर्माण केली.

पुलिन बिहारी यांचे डाक्क्यातील समितीच्या कार्याने ब्रिटिश सरकारच्या नोकरीत असलेले व व्यापार करणारे लोक एवढे प्रभावित झाले की, त्यांनी आपला व्यवसाय सोडून या संघटनेत प्रवेश मिळविला.

पुलिन बिहारी यांचा जन्म ता. २८ जानेवारी १८७७ रोजी फरीदपूर जिल्हयातील ( आता बांगला देशात ) लोणीसिंग गांवी मध्यम कुटुंबात झाला. पुलिनचे आजोबा गौरचंद्र दास तहसीलदार होते. त्यांच्या कुटुंबात अनेक तहसीलदार झाले यामुळे लोणीसिंग या गावाला तहसीलदार ( बाराबारी ) असे थट्टेने म्हटले जाई. पुलिनचे वडील नमकुमारदास फरीदपूर येथे वकिली करीत होते. पुलिनची आई स्वर्णसुंदरी देवी याही सुशिक्षित होत्या. त्या उत्तम चित्रकार व गायिका होत्या. शिक्षणतज्ज्ञ आश्विनी दत्त यांच्या ब्रिजमोहन विद्यालयात पुलिन बिहारी यांचे शालेय शिक्षण झाले १८९४ मध्ये शालेय शिक्षण पुरे होऊन त्यांनी डाक्क्याच्या महाविद्यालयात प्रवेश मिळवला. बंकिमचंद्र आणि भूदेव मुखोपाध्याय यांचे त्यासुमारास निधन झाले. पुलिन बिहारींनी कॉलेज शिक्षण पुरे केले. कॉलेजमधील प्रा. के. पी. बसू यांच्या मार्गदर्शनाखाली बाल अंकगणित व बीजगणित यावर शालेय पुस्तके लिहिली.

पुलिन बिहारी यांचा वयाच्या एकविसाव्या वर्षी विवाह झाला. वडील वारल्यामुळे संसाराची सर्व जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. त्यांनी खासगी शिक्षक म्हणून परेश, नरेश, जोगेश गुप्ता या बंधूंना शिकवण्याचे काम पत्करले. ( हेच जोगेश गुप्ता प्रख्यात कायदेपंडित व काँग्रेस नेते म्हणून विख्यात झाले )

यावेळी डाक्क्यामध्ये फाळणीविरोधी वातावरण शिगेला पोहोचले होते. पुलिन बिहारी व त्यांचे सहकारी सुरेश नाग यांनी

आब्बास सरदार व प्रो. मार्थेना या तुर्क शिक्षणतज्ज्ञाकडून लाठी व तलवार चालविण्याचे शिक्षण घेतले.

पुलिन बिहारींनी शिक्षण घेत असतानाच डेप्युटी मॅजिस्ट्रेटच्या नोकरीसाठी सरकारकडे अर्ज केला. त्यांच्या नेमणुकीबद्दल प्रा. के. पी. बसू, हरिनाथ डे, पुलिन यांच्या वडिलांचे वर्गमित्र न्यायमूर्ती चंदमदल घोष यांनी शिफारस केली. पण पुलिन स्वदेशी चळवळीत भाग घेतात असा गुप्त पोलीस खात्याचा रिपोर्ट असल्यामुळे त्यांना नकार देण्यात आला.

पुलिन बिहारींच्या अर्जाची अशातऱ्हेने वासलात लागल्याचे वृत्त बॅरिस्टर प्रेमनाथ मित्रा यांना कळले. ते तत्काळ तारकानाथ दास यांच्यासह कलकत्याहून डाक्क्याला आले. या तिघांनी बिपिन-चंद्र पाल यांचे डाक्क्यात भव्य स्वागत करण्याचे ठरविले. लेफ्टनंट गव्हर्नर मि. फुल्लर यांनी समारंभावर बंदी घातली. पण बंदी हुकूम मोडून हा स्वागत समारंभ साजरा करण्यात आला. या समारंभात भाग घेण्यासाठी अलोट गर्दी लोटली. या स्वागत समारंभाच्या सभेत राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे स्थापनेची घोषणा करण्यात आली. संस्थेचे काम सुरू झाले. पुलिन बिहारींनी अनुशीलन समितीच्या सदस्यांतून शिक्षकांची निवड केली. त्यावेळी सरकारी शाळांतून जाणाऱ्या विद्यार्थ्यांना या संस्थेचे एवढे आकर्षण निर्माण झाले की, विद्यार्थ्यांनी शाळांवर बहिष्कार टाकून राष्ट्रीय शिक्षणसंस्थेच्या शाळात आपणहून प्रवेश मिळविला संस्थेच्या खर्चाची जबाबदारी आनंद चक्रवर्ती यांनी आपल्याकडे घेतली. या शिक्षणसंस्थेने कोणतेही सरकारी अनुदान अगर निर्बंध मान्य करावयाचे नाहीत असे ठरविले.

राष्ट्रीय शिक्षण संस्थेची स्थापना करण्याचे कार्य चालू असतानाच महाराष्ट्रात युद्धशास्त्रात प्रवीण असे तीनशे तरुण तयार

करण्यात आले असून असंख्य तरुण अशातऱ्हेने शिक्षण घेऊन तयार होतील असा गुप्त संदेश प्रेमनाथ मित्रा यांना बाबू अरविंद घोष यांचेकडून आला तेव्हा डाक्क्यात निदान दहा हजार सैनिक तयार होणे जरूर आहे असे मित्रा यांनी पुलिन बिहारींना सांगितले. पुलिन बिहारी त्या उद्योगाला लागले व थोडयाच दिवसात डाक्का जिल्हयात सातशे लष्करी शिक्षणाची केंद्रे उघडण्यात आली.

पुलिन बिहारींच्या या कार्याला स्वामीबागचे सद्‌गुरु स्वामी त्रिपुरलिंग यांचा आशीर्वाद होता व प्रसंगी ते त्यांना मार्गदर्शनही करीत असत.

बंगालमध्ये मुझफरपूर येथे तारीख ३०-४-१९०८ रोजी खुदीराम बोस, कन्हैय्यालाल दत्त व प्रफुल्ल चाकी यांनी जो बॉम्ब-स्फोट केला त्यात केनेडीबाई व तिची कन्या ठार झाली. या गुन्हया-बद्दल उभयतांना फाशी देण्यात आले. प्रफुल्ल चाकी यांनी आत्म-समर्पण केले हा बॉम्ब म्हणजे बंगालमधील क्रांतिकारकांच्या कार्याचा श्रीगणेशा समजला गेला.

या घटनेमुळे बंगालमध्ये काय पण महाराष्ट्र, पंजाब, मद्रास, संयुक्त प्रांत या प्रांतात त्याचे पडसाद उमटले. या बॉम्ब प्रकरणात अनेकांना कारावास, वृत्तपत्रकारांना शिक्षा, दंड वगैरे सोसावा लागला. बंगाल प्रांत हा राजद्रोहाचे शस्त्रागार आहे व प्रत्येक बंगाली तरूण हा राजद्रोही आहे असा समज सरकारी वर्तुळात समजला जाऊ लागला.

याच वेळी राजकीय चळवळीस लागणाऱ्या पैशाकरता बंगाली क्रांतिकारकांनी कांही ठिकाणी राजकीय दरोडे घातले. डाक्क्याचे कलेक्टर मि. ॲलन प्रवास करीत असताना त्यांच्यावर गोलंदी रेल्वे स्टेशनवर गोळ्या झाडण्यात आल्या. मि. ॲलन कलकत्त्याच्या

इस्पितळात जखमी अवस्थेत निधन पावले.

अॅलन यांच्या हत्येच्या संबंधात पोलीसांनी अनुशीलन समितीच्या सदस्यांची धरपकड केली. पुलिन बिहारीदास व त्यांचे सहकारी यांना कोर्टात हजर राहण्याचा पोलीसांनी हुकूम केला. हे सर्वजण कोर्टाच्या आवारात प्रवेश करताच सर्वांनी वंदेमातरमची घोषणा केली

या युवकांच्या घोषणेने मॅजिस्ट्रेट बेचैन झाले व त्यांनी या सर्वांना घरी जाण्याचा हुकूम केला. पण पुलिन बिहारी यांना पोलीसांनी अठरा दिवस पोलीस कोठडीत डांबून ठेवले व नंतर सोडून दिले.

अनुशीलन समितीचे तरूण युवक हाती लागत नाहीत हे पाहून पोलीसांनी दडपशाहीचा वेगळा मार्ग पत्करला. या सर्वांवर पोलीसांनी मुले पळवून नेण्याबद्दलचा आरोप ठेवून गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न केला पण त्यातही त्यांना अपयश आले.

सतरा दिवसांच्या कच्च्या कैदेतून सुटका होताच पुलिन बिहारी यास त्यांचे मित्रांनी भूमिगत राहून कार्य करण्याचा सल्ला दिला पण तो त्यांनी मानला नाही. आपल्यावर पोलीस जे जुलूम जबरदस्ती करतील व कैदेत ठेवतील त्यामुळे असंतोष वाढण्याला उलट मदतच होईल, असा युक्तिवाद त्यांनी मित्रांसमोर मांडला व भूमिगत होण्यास स्पष्ट नकार दिला.

पुलिन बिहारी यांची सुटका झाल्यानंतर एक दिवस पोलिस ऑफिसर त्यांच्या अटकेचे वॉरंट घेऊन त्यांच्या घरी आले. त्यांना सरकारने १८१८ च्या रेग्युलेशन कायद्याखाली अटक केली व गुरखा पलटणीच्या बंदोबस्तात त्यांची पंजाबमधील मॉटेगोमरी तुरूंगाकडे रवानगी केली. त्यांच्या बरोबर भूपेश नाग, कृष्णकुमार मित्रा, शाम

सुंदर चक्रवर्ती, राजा सुबोध मलिक व इतर बऱ्यांच जणांना अटक करून मॉंटेगोमरी तुरुंगात डांबण्यात आले.

दोन वर्षाच्या कालावधीनंतर या सर्वांची सुटका करण्यात आली.

पुलिन बिहारी कलकत्त्याला आले व त्यांनी बॅ. प्रेमथनाथ मित्रा आणि अरविंद घोष यांची भेट घेतली व भावी योजनेबद्दल चर्चा केली. त्याचवेळी आचार्य प्रफुल्लचंद्र रॉय यांच्याबरोबर शस्त्रउत्पादन व स्फोटक द्रव्याबाबत चर्चा केली.

बंगालमधील सशस्त्र चळवळीला पायबंद बसावा म्हणून सरकारने डाक्क्याची अनुशीलन समिती बेकायदा ठरविली व तिच्या कार्यावर बंदी घातली. यावेळी अनुशीलन समितीच्या असंख्य शाखा बंगाल, बिहार, पंजाब, मद्रास, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र या प्रांतात पसरल्या होत्या. कलकत्त्याचे पोलीस कमिशनर सर चार्लस टेगार्ट यांनी गुप्त पोलीस अधिकारी नृपेन घोष यांच्यामार्फत पुलिन बिहारी यांची भेट घेतली व अनुशीलन समितीच्या सदस्यांची नांवे व कार्यक्रम यांची माहिती त्यांनी दिली तर एक लाख रूपये रोख बक्षिसादाखल व पाचशे रुपये पगाराची मोठ्या हुद्याची नोकरी देण्याबद्दल आपण शिफारस करू असे त्यांना सुचविले. पण ही तिरस्करणीय सूचना त्यांनी फेटाळली व त्यांची कठोर निर्भत्सना केली. ( गुप्त पोलीस अधिकारी नृपेन घोष हे काही दिवसांनी कलकत्त्याच्या चितपूर रोडवर मृतावस्थेत पडलेले लोकांना आढळून आले. )

पुलिन बिहारी कलकत्त्याहून परत आले. पोलीस त्यांच्या मागावर होतेच. पोलिसांनी त्यांच्या डाक्क्याच्या घराची झडती घेतली व काही पत्रके व लहान मुलांची छोटी एअरगन जप्त केली. ( झडती घेणारे पोलीस ऑफिसर बंकीम चौधरी व यांचा मैमनसिंग

येथे कांही दिवसांनी खून झाला) झडतीनंतर त्यांना अटक करण्यात येऊन मॅजिस्ट्रेटसमोर उभे करण्यात आले. पुलिन बिहारी यांच्याबरोबर त्यांचे धाकटे बंधू प्रमोद बिहारी, सचिन, शशी, असर घोष, बंकीमराय वगैरे चाळीस लोकांना अटक करण्यात आली. त्रैलोक्यनाथ चक्रवर्ती महाराज व अमृत हाजरा हे उभयता फरारी झाले.

या सर्वांवर बादशहाविरुद्ध बंड पुकारणे, बेकायदा शस्त्रे जमा करणे, अधिकाऱ्यांचे खून करणे हा खटला मॅजिस्ट्रेट बेन्टिग यांच्यासमोर चौकशीसाठी आला. त्यात आरोपींच्या वतीने शतिश चतर्जी, शशांक बसू, बिंबू गुहा, धाकुर्ता, निबारन गुहा, मुस्ताफी यांनी काम चालविले तर सरकारच्या वतीने नलिनी गुप्ता व पी. एल. रॉय यांनी काम चालविले. खटल्यातील कागद वाचण्यासाठी रॉय यांना एक लाख रूपये मेहेनताना देण्यात आला. खटला चालविण्यासाठी त्यांना दररोज दहा हजार रुपये देण्याचे ठरले. खटल्याचे काम सात महिने चालले व त्यात सरकारच्या वतीने चारशे साक्षी घेण्यात आल्या. त्यानंतर खटला सेशन कमिट करण्यात आला.

सेशन कोर्टात खटला सुरू झाला तेव्हा सी. आर. दास यांनी कायद्याचे मुद्दे उपस्थित केले. यावर निर्णय घेण्यासाठी सेशन जज्जांनी खटला हायकोर्टाकडे खुलाशासाठी पाठविला. दोन महिन्यांच्या कालावधीनंतर सेशन जज्ज यांनी पुलिन बिहारीदास, अशुतोष दासगुप्ता व ज्योतीर्मय रॉय यांना आजन्म कारावासाची सजा सुनावली.

सेशन कोर्टाच्या या निकालावर बॅ. निशित सेन यांनी हायकोर्टात अपील दाखल केले. बॅ. सी. आर. दास यांनी आरोपींच्या वतीने काम चालविले. अपिलाची सुनावणी जस्टिस हॅरिंग्टन व

जस्टिस अशुतोष मुखोपाध्याय यांच्यापुढे होऊन त्यांनी जन्मठेप शिक्षा रद्द करून ती सात वर्षे केली.

पुलिन बिहारी यांची लवकरच अंदमानच्या सेल्युअर जेलकडे रवानगी केली. तेथे त्यांच्याप्रमाणे बारिंद्रकुमार घोष, हेमचंद्र उपेंद्रनाथ बंडोपाध्याय, सुरेश सेन, बॅ. वि दा सावरकर व त्यांचे बंधु ग. दा. सावरकर, पंडित परमानंद झांशीवाले व अनेक क्रांतिकारकांना ठेवले होते.

ब्रिटिश सरकारने १९११ मध्ये बंगाल फाळणीचा निर्णय रद्द केला.

सात वर्षे अंदमानमध्ये काढल्यानंतर पुलिन बिहारी यांना परत कलकत्त्यात आणण्यात आले व त्यांच्या राहत्या घरात स्थानबद्ध केले. सन १९१८ मध्ये पूर्ण सजा भोगल्यानंतर पुलिन बिहारी यांनी पुन्हा आपल्या कार्यास सुरुवात केली डाक्का, कोमिल्ला, चितगांग वगैरे गावांना भेटी देऊन त्यांनी समितीच्या सदस्यांची पुन्हा संघटना उभी केली.

या घटना घडत असतानाच भारतातील क्रांतिकारक चळवळीची माहिती गोळा करण्यासाठी ब्रिटिश सरकारने जस्टिस रौलट यांच्या नेतृत्वाखाली समिती नेमली. सन १९१८ मध्ये या समितीचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. या अहवालामध्ये अनुशीलन समितीच्या संपूर्ण कामाची माहिती देण्यात आली.

या अहवालाच्या प्रसिद्धीमुळे क्रांतिकारक अधिक जागृत झाले. त्यांनी आपल्या पूर्वी झालेल्या चुका दुरुस्त करून पुन्हा जोराचा उठाव केला.

क्रांतिकारकांच्या या नवीन उठावामुळे रौलट कमिटीचा अहवाल कारणीभूत होत आहे हे पाहून सरकारने स्वतः प्रसिद्ध केलेल्या

अहवालाच्या प्रती विकण्याचे बंद ठेवले.

राजकीय क्षितिजावर महात्माजींचा १९२० मध्ये उदय झाला. त्यामुळे राजकीय चित्र संपूर्ण बदलले. गांधीजींनी सत्याग्रह व असहकार चळवळीची मोहीम हाती घेतली. नागपूर येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनास बॅ सी. आर दास, पुलिन बिहारी व त्यांचे शंभर सहकारी हजर राहिले.

अधिवेशनास हजर राहून पुलिन बिहारी परत कलकत्त्याला आले. देशबंधू सी. आर. दास यांच्या घरी स्वातंत्र्य चळवळीची दिशा यावर बॅ. सुबोध रॉय ( डॉ. बिपनचंद्र रॉय यांचे थोरले बंधु ) बॅ. हिमांशु बोस व पं. मोतीलाल नेहरू यांच्या समवेत महात्मा गांधी-बरोबर त्यांची प्रदीर्घ चर्चा झाली. त्यावेळी पुलिन बिहारी यांच्या राजकीय मताबद्दल आपले प्रामाणिक मतभेद असल्याचे गांधीजींनी सर्वांना सांगितले.

या भेटीनंतर कलकत्त्याला क्रांतिकारकांचे एक अधिवेशन भरले. त्यात प्रमुख पाहुणे म्हणून पंजाबकेसरी लाला लजपतराय व पं मदनमोहन मालवीय यांची भाषणे झाली.

यानंतर अनुशीलन समितीवर सरकारने बंदी घातली व बऱ्याच क्रांतिकारकांना अटक करण्यात येऊन त्यांच्यावर खटले भरण्यात आले. काही क्रांतिकारक भूमिगत झाले.

अनुशीलन समितीवर बदी येताच पुलिन बिहारी यांनी नलिनी किशोर गुहा यांच्या सहाय्याने भारत सेवक संघ नावाची क्रांतिकारी संस्था स्थापन केली. क्रांतिकारी लिखाणाचे काम गुहा यांच्याकडे सोपविण्यात आले. भारत सेवक संघामार्फत शंख या नावाने एक गुप्त पत्रिका काढण्यात येत असे.

पुलिन बिहारी दास एकदा शांतिनिकेतनमध्ये गेले व त्यांनी

रवींद्रनाथ टागोर यांना आपल्या कार्यांत सहकार्य देण्याची विनंती केली. रवींद्र बाबूंनी त्यांची सूचना तात्काळ मान्य केली व शंख पत्रिकेत छापण्यासाठी काही कविताही दिल्या.

पुलिन बिहारी यांनी १९२८ मध्ये कलकत्त्यात केशवचंद्र सेन रोडवर एक घर घेतले व तेथे त्यांनी वंगीय व्यायाम समिती स्थापन केली. त्या संस्थेतर्फे लाठी, तलवार, देशी खेळ, आत्मसंरक्षण आदींचे शिक्षण देऊ लागले. या संस्थेतर्फे देण्यात येणाऱ्या शिक्षणाने आचार्य जगदीशचंद्र बोस, अबला बोस, रामानंद चतर्जी वगैरे अत्यंत प्रभावित झाले. रवीन्द्रनाथ टागोर यांनी शांतिनिकेतनमध्ये या पद्धतीने शिक्षण घेण्याची सर्वांना सूचना केली. अबला बोस यांनी ब्राम्ही कन्या शाळेतही शिक्षणक्रम चालू केला.

पुलिन बिहारी यांनी व्यायामावर लिहिलेले लेख पुढे पुस्तक-रूपाने प्रसिद्ध झाले. या संस्थेच्या देशात अनेक शाखा उघडण्यात येऊन युवकांना शारीरिक शिक्षण, लाठी, बोथाटी, जंबिया, तलवार इत्यादि आत्मसंरक्षणाचे शिक्षण देण्यात येऊ लागले.

अंदमानच्या तुरुंगवास, प्रवास, शारीरिक श्रम यांमुळे त्यांची प्रकृती खालावली. त्यातच त्यांना बारीक तापाने गाठले आणि १७ ऑगस्ट १९४९ च्या सायंकाळी ५ वाजता त्यांनी आपली इहलोकीची यात्रा संपवली

आपल्या जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत पुलिन बिहारी यांनी आपले संपूर्ण जीवन देशाला वाहिले.

भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास अनेक रोमहर्षक घटनांनी भरलेला आहे. १८५७ च्या सशस्त्र क्रांतीपासून १९४७ पर्यंत अनेक रोमहर्षक प्रसंग घडले. एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतात सशस्त्र उठावाचे अनेक प्रयत्न झाले. रँड आणि हमिल्टन या जुलमी ब्रिटिश अधिकाऱ्यांची हत्या करून ब्रिटिश साम्राज्याला लवकरच आपला गाशा गुंडाळावा लागेल, असे चाफेकर बंधूंनी आपल्या कृतीने दाखवून दिले. भारतीय जनता यापुढे ब्रिटिश गुलामगिरी अधिक काळ सहन करणार नाही, हे या त्रिवर्ग चाफेकर बंधूंनी ब्रिटिशांना बजावले. विसाव्या शतकाच्या प्रारंभी खुदीराम बोस यांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीला एक जबरदस्त तडाखा दिला. खुदीराम बोस यांची आठवण विसरते न विसरते तोच अलिपूर हत्त्याःकांड घडले.

या शतकाच्या प्रारंभी या क्रांतिकारक चळवळीला अधिक जोर आला. बंगालमध्ये अरविंद घोषांच्या अनुशीलन समितीचे कार्य वाढतच होते. बारिंद्र घोष यांनी आपले ' युगांतर ' पत्रातून प्रचाराची मोहीम उघडली होती जनता हे वृत्तपत्र अत्यंत आवडीने वाचत असे. होथीलाल व हेमचंद्र यांनी बॉंब तयार करण्याची माहिती मिळवून आणली होती व त्यांच्या सायक्लोस्टाईल प्रती अनेक प्रांतातील अनेक संस्थांना देण्यात आल्या होत्या.

' माणिकतोळा ' प्रसिद्ध बागेतील एका खोलीत बारिंद्रकुमार घोष यांनी बॉंब तयार करण्याचा कारखाना उघडला. त्यासाठी अनेक ठिकाणावरून लागणारे साहित्य जमा करण्यात आले.

खुदीराम बोस यांना फाशी दिल्यामुळे हिंदी जनता अधिक

रूष्ट आहे, हे सरकारला माहीत होते.

माणिकतोळा बागेत बॉम्ब तयार करण्यात येत आहेत, अशी कुणकुण पोलिसांना लागली. गुप्त पोलीस खात्याकडून चौकशीची चक्रे फिरू लागली

गुप्त पोलिसांच्या हालचाली क्रांतिकारकांना न कळल्यामुळे ते बेसावध होते. एक दिवस अचानकपणे पोलिसांनी माणिकतोळा बागेला वेढा दिला व चाळीस क्रांतिकारकांना अटक करण्यात आली. त्यांत बारिंद्रकुमार घोष, उल्हासकर दत्त, अरविंद घोष, कन्हयालाल दत्त हे प्रमुख होत.

या माणिकतोळा बॉम्ब केसमध्ये पकडलेल्या क्रांतिकारकांना अलिपूर जेलमध्ये ठेवण्यात आले.

पुढे यांच्यावर खटला भरण्यात आला. हा खटला दोन वर्षे रेंगाळत होता. या दरम्यानचे काळात दोन-तीन हत्त्या घडल्या. तारीख १० जानेवारी, १९०९ व २४ फेब्रुवारी १९१० रोजी दोन ब्रिटिश डी. एस. पी. क्रांतिकारकांच्या हल्ल्याला बळी पडले.

खटल्याची सुनावणी१९१०साली हायकोर्टात चालू असतानाच कन्हयालाल दत्त व सत्येंद्र कुमार यांनी नरेंद्र गोस्वामी या माफीच्या साक्षीदाराला गोळी घालून ठार केले. या सर्व गोष्टीचा शेवट या उभयतांना फाशी जावे लागले.

कन्हयालाल दत्त यांचे व्यक्तिमत्व मोठे आकर्षक होते. तसेच ते बुद्धिमान होते. लहानपणापासून डोळ्यात दोष असल्यामुळे ते चष्मा वापरत. एक शर्ट, धोतर व फेटा हा त्यांचा नेहमीचा वेष असे. तुरुंगात असतानाच त्यांनी बी. ए चा अभ्यास केल. फाशी गेले, त्यावेळी त्यांचे वय अवघे चोवीस वर्षाचे होते

अलिपूर बॉम्ब खटल्यामध्ये भाग घेणारे कन्हयालाल दत्त,

सत्येंद्रकुमार यांच्यावर रीतसर खटला भरण्यात आला. पोलिसांनी तसा पुरावाही गोळा केला.या केसमधील नरेंद्र गोस्वामी हे पोलिसांच्या अत्याचाराला कंटाळून माफीचे साक्षीदार झाले. नरेंद्र गोस्वामी यांना क्रांतिकारक चळवळीची आणि सर्व योजनांची संपूर्ण माहिती होती.

पोलीस हा खटला शक्य तितक्या लवकर चालावा म्हणून खटपट करीत होते. खटल्यात नरेंद्र गोस्वामी यांची साक्ष झाली असती, तर सारे सदस्य फुटले असते व या क्रांतिकारक मालिकेतील बारिंद्रकुमार घोष व उल्हासकर दत्त यांना जन्मठेपेच्याऐवजी फाशीची सजा झाली असती.

अलिपूर तुरुंगातच कन्हयालाल व सत्येंद्र यांनी गोस्वामीला ठार मारण्याची योजना आखली. प्रथमपासूनच नरेंद्र गोस्वामी यांना इतरांपासून अलग ठेवण्यात आले होते. नरेंद्रला मारण्यासाठी त्यांना रिव्हॉल्व्हरची गरज होती. अनेक युक्तिप्रयुक्तीनी त्यांनी रिव्हॉल्व्हर पैदा केले, पण नरेंद्राची भेट कशी होणार ? हा त्यांच्यापुढे प्रश्न निर्माण झाला.

आजारीपणाचे सोंग करून कोठडीतून दवाखान्यात दोघांनी जायचे व तेथे आपण या आजारामुळे वाचत नाही, मरण्यापूर्वी खरे काय ते सांगून टाकायचे, असा खोटा अविर्भाव करण्याचे त्यांनी ठरविले. ठरल्याप्रमाणे कन्हयालाल थोड्या दिवसांत उपचारासाठी दवाखान्यात आले. त्यांचे मागोमाग सत्येंद्र पण दाखल झाले.

या उभयतांनी इत:पर क्रांतिकारक चळवळीत भाग घेणार नाही, असे पोलिसांना सांगितले व माफीचे साक्षीदार म्हणून होण्यासही आपण तयार असल्याचे सांगितले. त्यांच्यावरील नियंत्रणे शिथिल करण्यात आली.

नरेंद्र गोस्वामीला ही वार्ता पोलिसांनी मुद्दाम सांगितली. त्यालाही समाधान वाटले. पोलिसांच्या परवानगीने तो वारंवार या उभयतांच्या समाचाराला येऊ लागला.

एक दिवस नरेंद्र सत्येंद्राच्या पलंगावर बसला होता. वेळ साधून सत्येंद्राने आपल्या उशीखालचे पिस्तुल काढले व नरेंद्रावर रोखले. हे पाहून नरेन्द्राची भीतीने गाळण उडाली. तो दाराकडे धावला. सत्येंद्र व कन्हयालाल त्यांच्या मागे धावले.

पिस्तुलाचा आवाज झाला. नरेंद्राच्या डाव्या पिंढरीत एक गोळी घुसली. तसाच तो पळू लागला. 'धावा! धावा! वाचवा मला वाचवा!' असे ओरडतच तो पळू लागला. सगळीकडे धावपळ सुरू झाली. सत्येंद्र व कन्हयालाल यांनी दारावरील रक्षकाला दटावून विचारले, नरेंद्र ज्या दिशेला पळाला ती दिशा त्याने त्यांना सांगितली.

"तुम मुखबीर बनाना चाहते हो?" सत्येंद्र ओरडला.

— आणि थोड्याच अंतरावर देशद्रोही त्यांच्या गोळीला बळी पडला. नरेंद्राला मारताच उभयतांनी क्रांतीचा जयघोष केला.

ही वार्ता ऐकून सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी आपल्या 'बंगाली' वृत्तपत्र कचेरीत मिठाई वाटली.

ब्रिटिश सरकार हे कसे सहन करणार? त्यांना हा अपमान वाटला. कन्हयालाल व सत्येंद्र यांवर खटला भरण्यात आला. ता. १० नोव्हेंबर १९१० रोजी त्यांना फाशी देण्यात आले

विसाव्या शतकातील भारतीय स्वातंत्र्यासाठी फाशी जाणारे कन्हयालाल हे तिसरे क्रांतिवीर होते.

कन्हयालाल यांचा अंत्यविधी मोठ्या इतमामाने करण्यात आला. हजारो लोक त्यांच्या अंत्यदर्शनाला आले होते. चिता शांत

होताच हजारो लोकांनी त्यांची रक्षा आपल्या मस्तकाला लावून घेतली. कित्येकांनी ती पवित्र वस्तु म्हणून घरी नेली. आजही अनेकांच्या घरात ती तशीच जपून ठेवण्यात आली आहे

ही घटना पाहून ब्रिटिश अधिकारी भयभित झाले. त्याचा परिणाम असा झाला की,सत्येंद्राला फाशी देण्यात आले तेव्हा त्याचे उत्तरकार्य त्यांच्या नातेवाईकांना तुरूंगाच्या आवाराबाहेर करण्यास परवानगी देण्यात आली नाही.

दत्तांची आई त्यांना भेटण्यास तुरुंगात येणार होती. पण दत्तांनी तिला ' जर मला पाहून आई अश्रू ढाळणार असेल तर मला भेट घेण्याची इच्छा नाही. आईची ममता माझ्या कार्याच्या आड येता कामा नये म्हणूनच मी म्हणत आहे. ' असा निरोप पाठविला. जो नित्य मृत्युला आव्हान देत होता, त्याला मृत्यूचे भय कसले.

कन्हयालाल यांचे शव फाशीगृहातून आणण्यासाठी ५।६ जण तुरुंगात गेले होते. त्या सहाजणांमध्ये कन्हयालालचे थोरले बंधु आशुबाबू व मोतीलाल रॉय हे प्रमुख होते. ज्या ठिकाणी कन्हयालाल यांचे शव ठेवण्यात आले होते त्या अंधारकोठडीत तो इंग्रज जेलर सर्वांना घेऊन गेला. कन्हयालालचे शव कांबळ्याखाली झाकून ठेवले होते. आशुबाबूंनी अश्रु पुसत ते कांबळे दूर केले आणि शवाला मिठी मारुन हंबरडा फोडला.

त्या वृद्ध इंग्रज जेलरला हा प्रसंग पाहून वाईट वाटले. पाणावलेल्या डोळ्यांनी तो आशुबाबूच्या खांद्यावर हात ठेवून त्यांना म्हणाला,

' बाबूजी शोक का करता ? धन्य तो देश जिथे असे थोर वीर जन्माला येतात. मरण हे सर्वांनाच आहे, पण असे वीरांचे मरण फारच थोड्यांच्या वाट्याला येते. या खात्यात मी कित्येक वर्षे

काढली, फाशीची सजा झाल्यानंतर कन्हयालाल सारखे आनंदी प्राणी मी जन्मांत पाहिले नाहीत. त्यावेळी जे हास्य मी पाहिले तेच हास्य मला आजही पाहायला मिळते आहे. फाशी देण्यापूर्वी त्यांचे वजन करण्यात आले, तर मला पूर्वीपेक्षा दहा पौंड वजन अधिक वाढलेले दिसले. कृपा करून शोक आवरा आता . . '

मागे एकदा दत्त मला म्हणाले होते, ' जेलरसाहेब, आमच्या हातातून तुम्हाला काही त्रास असेल, तर माफ करा. स्वातंत्र्य-प्राप्तीकरिता हे सारं करणं आम्हाला भाग आहे. यात व्यक्तिद्वेषाचा लवलेशही नाही. '

कन्हयालाल यांनी आपल्या थोड्या आयुष्यात केवढे मोठे कार्य केले आहे ? ज्या स्वातंत्र्याचा जयघोष आपण आज करीत आहोत, त्याचे खरे जनक दत्तासारख्या थोर विभूति आहेत. याची आम्हाला कुठे आठवण आहे ?

# कु. प्रीतिलता ओहदेदार

फाशी कैद्याच्या कोठडीत शृंखलांनी जखडलेल्या फाशीचा दिवस आतुरतेने पाहणाऱ्या एका तरुणाला वॉर्डरने ओरडून सांगितले, ' तुला कोणीतरी भेटायला आले आहे. कदाचित ती तुझी बहीण असेल. जेलरसाहेबांच्या खोलीत तुला बोलावले आहे.'

फाशी कैद्याच्या कोठडीचे दार उघडले गेले. तो तरुण आपली दमदार पावले टाकीत ऐटीत जेलरचे खोलीकडे निघाला. जेलरच्या खोलीत प्रीतिदीदी रामकृष्णदासची आतूरतेने वाट पाहत होती.

कोण आलं असेल बरं आपल्याला भेटायला ? कदाचित प्रीतिदीदी तर नसेल ना ? आणि असले भलते धाडस कशाला कुणी केलं ? रामकृष्णदास स्वत:शीच विचार करीत होते. चेहऱ्यावर मात्र त्यांनी कसलाच भाव प्रकट केला नाही.

रामकृष्णदासने जेलरच्या खोलीत प्रवेश केला.

' दीदी, तू आलीस ? मला भेटायला ?' जेलरसाहेब माझी ही धाकटी बहीण. . .

' अस्सं ! बरं झालं. आजच भेट झाली. कदाचित् तुमचा उद्याच दिवस ठरला जाईल, असे दिसते. परमेश्वराची इच्छा !'

' दीदी, माझे शब्द लक्षात ठेव. देश स्वतंत्र करण्यासाठीच आपण भारतात जन्माला आलो आणि पुन्हा आपण येथेच जन्माला येणार आहोत. . . '

' दादा, सारं काही माझ्या लक्षात आहे. आपण दाखविलेल्या मार्गानेच मी जाणार आहे. आपल्या या हातातील शृंखलाच याला साक्ष आहेत.

मुलाखतीची वेळ संपली. प्रीतिलता रामकृष्ण दास यांची अखेरची भेट घेऊन तुरूंगाबाहेर पडली.

१९३० साली महात्माजींनी सत्याग्रह सुरू केला. बंगालमध्ये त्याचवेळी सशस्त्र क्रांतीचे पर्व सुरू झाले होते. त्याच्या अगोदर चितागाँग शस्त्रागारावर क्रांतिकारकांनी हल्ला केला. कटाचे धागे-दोरे पोलीसांना मिळाले या कटातील बऱ्याच लोकांना अटक होऊन शिक्षाही झाल्या. काही पोलीसांना चुकवून भूमिगत राहिले. रामकृष्ण-दास हे चितागाँग शस्त्रास्त्र कटातील एक प्रमुख क्रांतिकारक म्हणून ओळखले गेले होते.

प्रीतिलता ही चितागाँगची राहणारी. घरची परिस्थिति अत्यंत गरिबीची. तिचे वडील म्युनिसिपालीटीत नोकर होते. पण ते प्रथम-पासूनच ब्रिटिश द्वेष्टे होते. दीदीलाही प्रथमपासूनच ब्रिटिश राज्य-कर्त्याबद्दल तिरस्कार वाटत असे. चितागाँगला मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाल्यानंतर ती डाक्क्याला 'बेथ्यून कॉलेजात' शिक्षणासाठी आली. याचवेळी चितागाँग दरोड्याचा बोलबाला खूप झाला होता. रामकृष्ण-दासची आपण बहीण आहोत, असे खोटे सांगून दीदी रामकृष्णदास यांना तुरूंगात भेटून आली.

रामकृष्णदास यांना तुरूंगात भेटून आल्यानंतर तिने पुन: क्रांतिकारकांच्या गुप्त समितीशी संधान जोडले. बी. ए. ची परीक्षा पास होताच ती चितागाँगला परत आली. त्याचवेळी तिचे वडील निधन पावले. उदरनिर्वाहासाठी तिने एका शाळेत शिक्षकेची नोकरी पत्करली. शिक्षिकेचे काम करीत असतानाच तिची प्रसिद्ध क्रांति-कारक निर्मलसेन व अपूर्वसेन यांची भेट झाली. निर्मलसेन यांनी तिला रिव्हॉल्व्हरचे नेमबाजीचे शिक्षण दिले. तिची अचूक नेमबाजी पाहून या क्रांतिकारकांचे सूत्रधार मास्तरदा ( रासबिहारी बोस )

यांना आश्चर्य वाटले. क्रांतिकारक चळवळीत स्त्रियांना प्रथम कधीच घेण्यात येत नसे. परंतु पुढे स्त्रियांही भाग घेऊ लागल्या होत्या.

एक दिवस धवलघाटच्या गुप्त आश्रमात प्रीतिदीदीईला मास्तरदा यांनी आपल्या गुप्त समितीत दीक्षा दिली व तिला अपूर्व सेन यांच्या स्वाधीन केले. प्रीतिदीदीने देशसेवेची व गुप्ततेची शपथ घेतली

क्रांतिकारक चळवळीच्या पुढील कार्यक्रमाची आखणी करण्यासाठी धवलघाटचे गुप्त आश्रमात सर्व क्रांतिकारक मंडळी सन १९३२ च्या १२ जूनला जमली होती. मास्तरदाही आले होते. परंतु ही बातमी फुटली व पोलीसांनी आश्रमाला वेढा दिला. गोळीबारांच्या फैरी झडू लागल्या. त्या पोलीसांच्या गोळीबारांना क्रांतिवीरांनी गोळ्यांनी उत्तर दिले. पण दुर्दैवाने या गोळीबारात पोलीसांच्या गोळ्यांना निर्मलकुमार सेन व अपूर्वसेन बळी पडले. परिस्थिति अतिशय प्रतिकूल दिसली. तेव्हा मास्तरदा व दीदी पोलीसांच्या वेढ्यातूनही मोठ्या धाडसाने निसटून गेले.

मास्तरदा निसटले हे पाहून पोलीस अधिकारीही गडबडले. त्यांनी सर्वत्र नाकेबंदी केली लोकांच्या येण्याजाण्यावर सक्त पहारा सुरू झाला. झडत्या, अटकेचे सत्र जारीने सुरू झाले, पण मास्तरदा यांचे कार्य संथपणे चालूच होते.

चितागाँगच्या डोंगरी विभागात एका खास इमारतीत ब्रिटिश अधिकाऱ्यांचा क्लब होता. या ठिकाणी अधिकारी लोक आपल्या कुटुबियांना घेऊन करमणुकीसाठी नित्य जमत असत. या क्लबावर हल्ला करण्याचे मास्तरदा यांनी ठरविले व क्लबाची माहिती काढण्यासाठी कल्पना दत्त वगैरे तरुणींना पाठविले पण वाटेतच त्यांना अटक झाली. यामुळे क्लबवरील हल्ल्याची योजना काही काळ स्थगित केल्या.

सप्टेंबरच्या चोवीस तारखेस क्लबावर हल्ला करण्यासाठी प्रीतिदीदी आठ तरुणी सह बॉब पिस्तुल घेऊन निघाल्या. क्लबजवळ येताच प्रीतिदीदीने पहिली गोळी झाडली. दुसऱ्या तरुणीने क्लबाच्या छपराच्या रोखाने बॉंब फेकला. बॉंबस्फोटाने क्लबाचे छप्पर उध्वस्त झाले. छपरावरील खापऱ्या दूरवर फेकल्या गेल्या. छप्पर मोडून त्याचा काही भाग खाली कोसळला. आकस्मिकपणे गोळीबाराने तेथे जमलेले सर्व लोक घाबरून गेले. प्रत्येकजण आपला जीव बचा-विण्यासाठी आसरा पाहू लागला होता.

गोळीबाराचा आवाज ऐकून थोड्या अंतरावर असलेली पोलीसतुकडी धावून आली. या तरूणींनी आपला रोख पोलीसांकडे वळविला आणि गोळीबारास सुरूवात केली. गोळीबारात दोन पोलीस जागच्या जागी ठार झाले पोलीसांचा गोळीबार तीव्र होऊ लागला. आपल्या जवळचा दारूगोळाही संपण्याच्या मार्गावर आहे हे पाहताच त्यांनी माघार द्यायचे ठरविले आणि त्या हळुहळू मागे सरकू लागल्या. इतर तरूणी झपाट्याने मागे गेल्या. प्रीतिदीदी पुढे होती. मागे सरकत असतानाच एक गोळी तिच्या छातीत घुसली. छातीवर एक हात दाबून धरीत ती सरकू लागली. पण जखमेमुळे तिला चालणेही अशक्य झाले. ती एकदम खाली कोसळली. एक तरूणी प्रीतिदीदीजवळ आली. तिची ही अवस्था पाहून " प्रीतिदीदी-दीदी-दीदी !" हाका मारल्या. प्रीतिदीदीने त्यांना हाताचे खुणेने निघून जाण्यास सुचविले आणि जवळ बाळगलेली विषाची पुडी तिने खाल्ली. आपल्याला पोलीसांनी पकडून क्रांतिकारकांच्या चळवळीची माहिती मिळवण्याचा प्रयत्न करू नये म्हणून दीदीने हा मार्ग पत्करला.

या प्रसंगानंतर कित्येक दिवस या क्लबात कोणी अधिकारी येत नसे.

सन १९५६ साली दिल्लीस भरलेल्या क्रांतिकारकांच्या परिषदेचे अध्यक्ष लाला हनुमान सहाय यांनी अध्यक्षीय भाषणांत क्रांतिकारक चळवळीचा आढावा घेताना त्यांनी बाबू रास बिहारी बोस यांचा क्रांतिकारक चळवळीचे भिष्माचार्य म्हणून गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांच्या भाषणांत अनेक वेळा कृतज्ञता दिसून येत होती.

लाला हनुमान सहाय, अमीरचंद, अवधबिहारी व बालमुकुंद व विश्वास यांनी सन १९१२ साली दिल्लीस निघालेल्या व्हॉईसराय लॉर्ड हार्डिंज यांच्या शाही मिरवणुकीवर जो बॉम्ब फेकला त्याची सर्व योजना रासबिहारी यांचीच होती. ते या कटाचे सुत्रधार होते व त्यावेळी ते पोलीसांची नजर चुकवून दिल्लीतून निसटले ते अखेरपर्यंत ब्रिटीशांना मिळाले नाहीत.

रासबिहारी बोस यांचा जन्म ता. २५ मे १८६५ रोजी हुगळी जवळील परेला बेघारी या गांवात मामाच्या घरी झाला. ते जन्माने कायस्थ ब्राह्मण, त्यांचे बालपण व शिक्षण चंदननगरला झाले. त्यांच्या मनांत लष्करी शिक्षण घ्यावयाचे होते पण ते जमले नाही, म्हणून त्यांनी फोर्ट विल्यम किल्ल्यातील सरकारी अदालतीत नोकरी पत्करली व थोड्याच दिवसांत ते हेडक्लार्कच्या हुद्यावर गेले. कलकत्याहून त्यांची बदली डेहराडून रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये झाली.

रासबिहारी प्रथमपासून क्रांतिकारक विचारसरणीचे होते. सन १८५७ च्या युद्धातील व त्यानंतरच्या ब्रिटीशांच्या जुलमी राजवटीबद्दल त्यांना अत्यंत तिरस्कार वाटत असे. भारत स्वतंत्र कसा होईल. याचीच त्यांना तळमळ वाटत असे.

सन १९०४ साली झालेल्या रूसो जपान युद्धांत जपानने

रशियाचा सपशेल पराभव केला. या युद्धात जपानी लोकांनी जे शौर्य दाखविले त्याची त्यांच्या मनावर विलक्षण छाप बसली. जपानी लोका प्रमाणे आपणही राष्ट्रीय संघटना उभी करावी असा विचार त्यांच्या मनात आला व त्यानी त्या प्रमाणे आपले कार्य सुरू केले.

रासबिहारी सरकारी नोकरीत असतानाच ते गुप्तपणे क्रांतिकारकांची संघटना तयार करण्याचे कार्य करू लागले. याच संघटनेतील दिल्लीतील क्रांतिकारकांच्या सहायाने त्यांनी व्हाईयरॉय हार्डिंज यांच्यावर बॉम्ब फेकला.

दिल्लीत व्हॉईसरॉय यांच्यावर बॉम्बफेक झाल्यानंतर ते फरारी झाले, त्याना पकडण्यासाठी ब्रिटीश सरकारने साडेसात हजारांचे बक्षिस लावले. भारतातील प्रमुख शहरांत जागोजागी जाहीर नामे लावले, पण ब्रिटीश सरकारला या कामी यश लाभले नाही.

याच समयास युरोपांत युद्धाचे ढग जमू लागले. महात्मा गांधी वगैरे नेत्यांनी ब्रिटनला मदत करण्याचे ठरविले. लढाई सुरु होताच फार मोठ्या प्रमाणावर भारतीय लष्करी पलटणी युरोपच्या युद्धभूमीवर रवाना झाल्या. या योग्य संधीचा फायदा आपण घेतला तर ठीक नाहीतर भारत लौकर स्वतंत्र होण्याची आशा नको असे त्यांना वाटत होते

रासबिहारी व त्यांच्या सहकाऱ्यांनी या संधीचा फायदा उठविण्याचे ठरविले व त्यासाठी स्वतः रासबिहारी यांनी भारतभर गुप्त दौरा करून गुप्त संघटना बांधण्याचे कार्य जोमाने सुरू केले.

याच प्रयत्नाबरोबर त्यानी लष्करातही प्रचारकार्य सुरू केले. व त्यासाठी त्यानी काबूल ( अफगाणिस्तान ) पासून कोबे (जपान) पर्यंत सानफ्रान्सिस्को, अमेरिका ते बर्लिन (जर्मनी) पर्यंत संपर्क साधला. याचप्रमाणे ब्रह्मदेश, सिंगापूर येथे असलेल्या भारतीयांकडून

योग्य वेळी उठाव करण्याची तयारी केली. याकामी त्यांना त्यांचे सहकारी सचिंद्रनाथ संन्याल, विष्णू गणेश पिंगळे, कर्तारसिंग सरावा, रामगोपाळ सिंह, प्रतापसिंह बरवा यासारख्या अनेक क्रांतिकारकांनी सहाय केले.

सन १९१४ सालच्या प्रारंभी रासबिहारी बनारसला आले. बनारस मुक्कामात त्यांना भारतातील निरनिराळ्या प्रांतातील क्रांतिकारक भेटून गेले. रासबिहारी यांनी त्यांना उठावाची सर्व योजना सांगितली.

बनारसमध्ये असताना पिंगळे यांनी अमेरिकेहून चार हजार लोक याच कामासाठी भारतात आले असून बंडाचा उठाव होताच वीस हजार लोक परत येण्याची शक्यता असल्याची वार्ता त्यांना सांगितली. याच माहिती आधारे रासबिहारी यांनी सचिंद्रनाथ संन्याल यांना पंजाबात कामगिरीवर पाठविले व ती पूर्ण यशस्वी झाली.

सन १९१४ साली रासबिहारी, सचिंद्रनाथ, पिंगळे, कर्तारसिंग, पंडित परमानंद (झाशीवाले) यांनी अनेक ठिकाणच्या लष्करी छावण्यांना गुप्त भेटी देवून उठावाची तयारी केली.

रासबिहारी लाहोरला आले. लाहोरमध्ये कोणाही इसमास घर भाड्याने देण्यापूर्वी अगर कोणी परका पाहुणा आल्यास त्याची वर्दी सरकारी अधिकाऱ्यांना दिली पाहिजे असे फर्मान स्थानिक अधिकाऱ्यांनी काढले. रासबिहारी त्यांचे मित्र रामसरण यांच्या घरी उतरले होते. रामसरण हे नेहमी फिरतीवर असत त्यामुळे त्यांच्या पत्नीने आपले पती असे खोटे सांगून वेळ मारुन नेली व त्यांना ठेवून घेतले. रासबिहारी लाहोरमध्ये सन १९१५ च्या फेब्रुवारी पर्यंत राहिले.

क्रांतिकारकांनी भारतांत सर्वत्र एकदम उठाव करावयाचा

असे ठरले व त्या प्रमाणे गुप्त संदेश सर्वत्र पाठविण्यात आले. अलाहाबाद उठावाची जबाबदारी तेथील शिक्षक दामोदर स्वरूप यांच्यावर सोपविण्यात आली. विभुतिमित्र व प्रियानाथ या उभयतांची बनारस छावणीत व नलिनी मुकर्जी यांची जबलपूर छावणीत उठाव करण्याचे ठरले.

रासबिहारी व सचिंद्रबाबू यानी लाहोर येथे थांबण्याचे ठरविले. विनायकराव कपिले व त्यांचे सहकारी कलकत्याहून बॉम्बची पार्सले घेवून लाहोरला रवाना झाले.

सार्वत्रिक उठावाची तारीख २१ जुलै ही ठरविण्यात आली होती. परंतु प्रथमपासून पोलीसांना गुप्त कटाचा बातम्या पुरविण्याचे काम या संघटनेतील कृपालसिंह या नांवाचे गृहस्थ करीत होते. त्यांनी या उठावाची बातमी पोलीसांना दिली. यामुळे तारखेत बदल करण्यात येवून ती १९ जुलै ठरविण्यांत आली.

या उठावाच्या बातमीने सरकार खडबडून जागे झाले. अधिकारी अस्वस्थ झाले. रासबिहारी यांना जिवंत अगर मृत पकडून देणाऱ्यास एक लाख रूपयांचे बक्षीसही जाहीर करण्यात आले.

रासबिहारी यांनी क्रांतिकारकांची संघटना देशांत उभी केली त्याचप्रमाणे त्यानी इतर परदेशांशी संपर्क साधले. युद्धकाळांत त्यांनी जर्मन सरकारशी संधान बांधले व त्यांच्याकडून शस्त्रे दारुगोळा हत्यारे पुरविण्याचे मान्य करून घेतले.

याप्रमाणे मेवारिक व हेनरिच ही दोन मोठी जहाजे दारुगोळा शस्त्रे भरून भारताकडे यावयास निघाली. मेवारिक जहाजावर वीस हजार बंदुका, ऐंशी हजार काडतुसे, दोन हजार पिस्तुले, हातबाँब व इतर स्फोटक साहित्य होते. हेनरिच या जहाजावर दहा हजार बंदुका, दहा लाख काडतुसे व इतर स्फोटक साहित्य होतें. हा

माल गुप्तपणे बालासोर व रायमंगल या बंदरात उतरून घेण्याचे ठरले.

या कामगिरीवर रासबिहारी यांनी कॉमरेड एम. एन. रॉय यांची नियुक्ती केली होती. कॉ. रॉय हे त्यावेळी मार्टिन या नांवाने युरोपात वावरत होते. बटेव्हिया येथे ही जहाजे येऊन पोचली. हा माल रायमंगल ऐवजी हातिया या ठिकाणी उतरावा अशी सूचना मार्टीन यांनी जर्मन कॉन्सलला दिली.

तिसरे जहाज दारुगोळा भरून तयार झाले हे जहाज पोर्ट ब्लेअर (अंदमान) याठिकाणी जाऊन तेथील राजबंद्याना घेवून रंगुनला (ब्रह्मदेश) जाणार होते. तेथेही उठावाची तयारी झालीच होती.

बंगालमधील क्रांतिकारकांना जरूर ते साहाय देण्याची जबाबदारी हेलफिरीच या जर्मन राजदूतावर सोपविण्यात आली होती. हेलफिरीच यांनी एका चीनी दूताबरोबर सहासष्ट हजाराचे परदेशी चलन कलकत्यातील दोन लोकांकडे पाठविले. परंतु हा चीनी इसम दुर्देवाने सिंगापूर सोडत असताना चलनासह पकडला गेला.

रासबिहारी यांची ही परदेशी शस्त्रे आणण्याची कट योजना अधिकाऱ्यांच्या कानावर जातांच सर्वत्र कडक बंदोबस्त सुरु झाला. येणाऱ्या जाणाऱ्या इसमावर कडक नजर ठेवली जाऊ लागली. जर्मनीशी संधान बांधल्याबद्दल शिकोगा मध्ये या खास कामगिरी आलेले हेरंबलाल, बोहेन् व बेदी यांना अमेरिकन सरकारने अटक करून शिक्षा ठोठावली. शांघायमध्ये मार्टिन ( कॉ. रॉय ) यांच्या बरोबर असलेल्या इसमाला शिक्षा झाली व परदेशातून शस्त्रे आणण्याची योजना असफल ठरली.

रासबिहारी यांना भारतात रहाणे धोक्याचे झाले श्री. रविंद्रनाथ

टागोर हे जपानच्या दौऱ्यावर जाणार होते. त्यांचे सेक्रेटरी म्हणून पी. एन. टागोर या खोट्या बतावणीवर त्यांनी १२ मे १९१५ रोजी सुनकी मारू या जपानी जहाजावर प्रवेश मिळविला व भारतातून ते निसटले. वाटेत त्यांना अनेक ठिकाणी कठीण प्रसंगाना तोंड द्यावे लागले. शेवटी ते जपानला आले.

रासबिहारी जपानला आले ते टोकियोमध्ये मिसुई तोमाया यांच्याकडे ते आठ वर्षे अज्ञातवासात राहीले. या काळांत त्यांना अनेक ठिकाणी जागा बदलाव्या लागल्या. पुढे रासबिहारी यांनी तोमाया यांच्या कन्येशी विवाह केला व पुढे १९२३ साली त्यांना जपानचे नागरिकत्व मिळाले.

डॉ. रविंद्रनाथ टागोर यांनी जेव्हा जपानला भेट दिली त्या-वेळी त्यांची रासबिहारी यांची भेट झाली. त्यांच्या या महान कार्या-मुळे डॉ. टागोर अत्यत प्रभावित झाले. टागोर परत आल्यानंतर जपानमध्ये प्रचंड भुकंप झाला. यांत रासबिहारी यांची सारी चिज-वस्तु व रहाते घर उध्वस्त झाले. टागोर यांनी त्यांच्यासाठी पैसे गोळा करुन आर्थिक मदत गुप्तपणे रवाना केली.

रासबिहारी जपानमध्ये रहात होते तरी त्यांनी इतर देशांशी संपर्क ठेवले होते व तेथे ते भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करीत होते.

जालीयनवाला बाग हत्याकांड प्रसंगी त्यांनी जपानी व इतर वृत्तपत्रातून लेख लिहून ब्रिटिश सरकारवर कडक टीका केली व निषेधाच्या सभा घेतल्या.

रासबिहारी यांना जपानी लोक आचार्य म्हणून ओळखत असत. रासबिहारी उत्तम लेखक होते. त्यांनी आपल्या जपानच्या वास्तव्यात रामायण, महाभारत, भारतीय जनता परिचय, दलित

भारत, जागृत आशिया, सफलता, टागोर यांच्या कविता वगैरे सोळा ग्रंथ लिहीले.

जपानमध्ये त्यांनी एशियन रिव्हयू व इंडियन रिव्हयू अशा दोन पत्रांचे संपादकीय काम केले.

रासबिहारी यांचा भारतीयांशी गुप्त पत्रव्यवहार चालूच होता. सचिंद्रनाथ संन्याल यांच्याशी त्यांचा पत्रव्यवहार सतत होता.

लाला लजपतराय यांचे केशवराय सबरवाल हे सेक्रेटरी होते. ते नंतर जपानला गेले. त्यांची व रासबिहारी यांची भेट झाली. सबरवाल हे रासबिहारी यांचे कार्य पाहू लागले. सबरवाल यांनी लिहीलेल्या पत्रांत जपानमध्ये रासबिहारी यांना मोठा मान दिला असे व केदारनाथ सहगल या क्रांतिकारकांमुळे आपणाला रास-बिहारींच्या भेटीचा योग आला असे म्हटले आहे.

लालाजी जपानला आले, त्यावेळी त्यांची व रासबिहारी यांची भेट झाली. त्यांच्या या कार्यामुळे लालाजींवर जबरदस्त छाप पडली.

लालाजी रासबिहारी यांच्या भेटीचा प्रसंग मोठा विलक्षण आहे. लालाजींना त्यांची ओळख करून देताना पी. एन. टागोर म्हणून ओळख करून दिली, पण पुढे सर्व खरी परिस्थिती कळताच लालाजी खुर्चीवरून उठले व त्यांनी रासबिहारींना कडकडून मिठी मारली.

याचवेळी जपानचे बादशहा टायसी यांच्या राज्यारोहणाचा समारंभ आला. रासबिहारी यांनी त्यानिमित्त खास भोजनाचा कार्य-क्रम ठरविला. समारंभाचे पाहुणे म्हणून लालाजींची नियुक्ती केली. लालाजींनी या प्रसंगी प्रभावी भाषण केले. अमेरिकन अॅडव्हायसर या अमेरिकन वृत्तपत्रात ही बातमी देताना लालाजींचा भारताचे

लाईड जॉर्ज म्हणून उल्लेख केला.

रासबिहारी यांच्या या हालचालीमुळे जपानचे बादशहा मार्किवस ओकमा यांनी रासबिहारी व त्यांना मदत करण्यासाठी आलेले हेरंबलाल यांना हद्दपार करण्याचा विचार करीत होते व भोजनानंतर ४।५ दिवसांनी तसा जपान सोडण्याचा हुकूम उभयतां-वर बजाविण्यात आला.

चीनचे नेते डॉ. सन्यत सेन यावेळी जपानमध्ये होते. रास-बिहारी यांनी त्यांच्याशी विचारविनिमय केला व श्रीमती तोमया यांच्या मदतीने ते अज्ञात ठिकाणी राहू लागले.

भोजन समारंभाचे वेळी लालाजी व वसाडा विश्व विद्यालयाचे कुलगुरू डॉ. सिनोजावा यांचा परिचय झाला. त्यांनी लालाजींना जपान सोडण्याचा सल्ला दिला.

दुसरे महायुद्ध सुरू झाले. रासबिहारी यांनी जपानमध्ये अस-लेल्या सर्व भारतीयांची संघटना उभारली. याच सुमारास त्यांनी म. गांधींजींना, राजगोपालाचारी, पं नेहरू, सावरकर आदि यांना पत्रे पाठवून आपले विचार कळविले. ९ ऑगस्ट १९४२ च्या दिवशी जनतेला उद्देशून दिलेल्या संदेशात भारतीयांनी म. गांधीना पाठींबा द्यावा व चळवळ उभारावी असे सुचविले व आपण स्वतंत्र सेना उभा-रण्याचे कार्य सुरु केले.

नेताजी सुभाषचंद्र बोस भारतातून निसटले व जर्मनीला गेले. तेथून ते जपानला आले. नेताजी जपानला येताच रासबिहारी यांनी चळवळीची सारी सूत्रे ता. ४ जुलै १९४२ रोजी सन्मानाने नेताजींना अर्पण केली व आपण एक सैनिक म्हणून कार्य करण्याचे ठरविले.

सन १९४३ ते ४५ पर्यंत नेताजींना रासबिहारी यांनी जरुर ते सर्व सहाय दिले. १९४५ च्या जानेवारी महिन्यांत रासबिहारी

आजारी पडले. वयमान झालेले. अहोरात्र कष्ट व चिंता यामुळे त्याच्या प्रकृतीवर फार मोठा परिणाम झाला. त्यांना दवाखान्यांत ठेवण्यात आले. रासबिहारी यांच्या आजाराची वार्ता जपानचे बादशहा यांना समजताच त्यांनी त्यांचा सन्मान करण्याचे ठरविले. त्याना गौरवार्थ उगवत्या सुर्याचे सुवर्णपदक देवून सनमान करण्याचे ठरले.

रासबिहारी यांना पदक अर्पण करण्यासाठी बादशहांचे प्रतिनिधी जनरल अरिसू दवाखान्यात आले त्यावेळी जनरलची भेट होताच रासबिहारी यांना गहिवरून आले. त्यांनी पाणवलेल्या डोळ्यांनी जनरलचे स्वागत केले. दवाखान्यातील शुश्रुषेसाठी असलेल्या सेवकांनी त्यांना उठवून बसविले. जनरल अरिसु यांनी त्यांच्या छातीवर पदक लावले व लष्करी पद्धतीने सलाम केला. थरथरत्या हातांनी रासबिहारी यांनी त्यांना भारतीय पद्धतीने नमस्कार केला जनरल अरिसु यांना गादीवर जवळ बसवून घेवून अगदी क्षीण आवाजात " आपल्या मदतीबद्दल आम्ही ऋणी आहोत असे बादशहाना माझा निरोप सांगा, भारत स्वतंत्र होण्याच्या मार्गावर आपल्या मदतीची अजूनही गरज आहे, परमेश्वर आपल्या बादशहाना उदंड आयुष्य देवो."

बोलण्याच्या श्रमाने रासबिहारींना ग्लानी आली. जनरल अरिसु यांनी पुन्हा एकवेळ लष्करी पद्धतीने अभिवादन करून त्यांचा निरोप घेतला.

रासबिहारी यांची प्रकृती दिवसेंदिवस बिघडत चालली. त्यांच्या प्रकृतीचे वर्तमान दररोज नेताजी व जपान बादशहा यांना कळविले जात होते.

अखेरच्या क्षणी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना जवळ बोलाविले

आणि स्वातंत्र्यलढा चालू ठेवण्याची विनंती केली. आणि अशाच परिस्थितीत ता. २१ जानेवारी १९४५ रोजी त्यांनी इहलोकीची यात्रा संपविली.

आपल्या आयुष्यातील पन्नास वर्षे देशाच्या स्वातंत्र्यासाठी खर्ची घालणाऱ्या, यासाठी खडतर विजनवास पत्करणाऱ्या या महान् देशभक्ताच्या स्मृतीला सादर प्रणाम.

## उपेंद्रनाथ बंदोपाध्याय

सन १९०७ साली कलकत्यातील माणिकतोळा बागेत बारिंद्रकुमार घोष यांच्या निवासस्थानी बॉम्ब तयार करण्याचा कारखाना असल्याची बातमी पोलीसांना लागली, तेव्हा पोलीसांनी त्यावर धाड घालून बारिंद्रकुमार घोष (अरविंद घोष यांचे बंधु) उल्हासकर दत्त, हेमेद्र दास, उपेंद्रनाथ वगैरेना अटक करून त्यांच्यावर ब्रिटीश साम्राज्यशाही उलथून पाडण्याचा आरोप ठेवून खटला भरण्यांत आला.

अलिपूर व माणिकतोळा या दोन्ही खटल्यांत या सर्वांना आरोपी करण्यांत आले होते. या सर्वांच्या वतीने प्रसिद्ध कायदेपंडित व पुढारी बॅ. सी. आर. दास यांनी खटला चालविला. त्यात बारिंद्रकुमार, उल्हासकर दत्त, उपेंद्रनाथ वगैरेना जन्मठेपेची शिक्षा झाली. बारा वर्षे अंदमानच्या तुरुंगात घालविल्यानंतर सन १९२० साली या सर्वांची मुक्तता करण्यात आली.

उपेंद्रनाथ हे मूळचे चंदनगरचे रहिवासी. सहा जून १८९९ साली त्यांचा एका मध्यम कुटूंबात जन्म झाला. त्यांचे वडील रामनाथ बॅनर्जी हे वैष्णव संप्रदायाचे तर मातोश्री शाक्त पंथाच्या अनुयायी होत्या.

उपेंद्रनाथ यांनी चंदनगरमध्ये प्राथमिक शिक्षण पुरे केल्यानंतर ते डुप्ले कॉलेजमध्ये दाखल झाले.

डुप्ले कॉलेजात शिक्षण घेत असताना उपेंद्रनाथ यांनी फ्रेंच भाषेचा विशेष अभ्यास केला व त्यावर प्रभुत्व मिळविले. त्यांना त्याबद्दल सुवर्णपदके देण्यात येवून त्यांचा गौरवही करण्यात आला

डुप्ले कॉलेजात शिक्षण घेत असताना त्यांच्या वाचनात

विवेकानंदाचे ग्रंथ आले. स्वामीजींच्या लिखाणावर ते एवढे आकृष्ट झाले की त्यानी शिक्षण सोडून देवून हिमालयातील स्वामीजींच्या मायावती आश्रमांत जावून राहिले, पण वडील व बंधु यांच्या आग्रहास्तव ते परत चंद्रनगरला आले.

उपेंद्रनाथ चंद्रनगरला परत आल्यानंतर त्यांनी एका शिक्षण संस्थेत शिक्षकाची नोकरी पत्करली. शिक्षणाचे काम करीत असतानाच त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये क्रांतिकारक चळवळीचा गुप्त प्रचार सुरू केला.

उपेंद्रनाथ यांनी शिक्षकांची नोकरी नऊ महिने केल्यानंतर ते त्यांचे मित्र ऋषीकेश कांजीलाल यांच्यासह पाटणा बरेली वगैरे ठिकाणांना भेट देत परत मायावती आश्रमांत दाखल झाले.

उपेंद्रनाथ यांचा मूळचा पिंड क्रांतिकारकाचा असल्याने त्यांचा कल मायावाद पेक्षा कर्मवादाकडेच अधिक होता.

मायावती आश्रमांत कांही काळ वास्तव्य केल्यानंतर उपेंद्रनाथ व कांजीलात हे पंजाबात आले.

पंजाबातील आपल्या वास्तव्यांत त्यांनी ठिकठिकाणी विद्यार्थ्यांच्या संघटना उभारल्या व त्यांना क्रांतिकारक चळवळीची दिक्षा दिली.

पंजाबातील आपले कार्य पुरे करून उपेंद्रनाथ कलकत्याला आले व अरविंद घोष यांच्या सूचनेवरून ते वंदेमातरम या वृत्तपत्राचे संपादकीय काम पाहू लागले व त्यानंतर त्यांच्याकडे युगांतरचे काम सोपविण्यांत आले. पुढे त्यांनी कलकत्याच्या नारायण बिजली व अमृतबझार पत्रिका यासारख्या वृत्तपत्रांत काम केले.

उपेंद्रनाथ यांचा सन १८९७ साली विवाह झाला. त्यांना एक मुलगा होता. सन १९०९ साली त्यांची अंदमानच्या तुरूंगात रवानगी

करण्यांत आली. त्यांच्या पत्नी अत्यंत धार्मिक वृत्तीच्या होत्या. उपेंद्रनाथ यांची अंदमानहून मुक्त होईपर्यंत त्या एखाद्या संन्यासिनी प्रमाणे रहात असत.

उपेंद्रनाथ यांनी सन १९०५ साली भवानी मंदिर या नांवचे एक पुस्तक लिहीले होते. या पुस्तकांत त्यांनी स्वातंत्र्य प्रातीसाठी तरूणानी कालीमातेची उपासना करावी व त्यासाठी त्यांनी अविवा-हित राहून सन्याशाप्रमाणे सेवाकार्य करावे व आपले ध्येय प्राप्त झाल्यानंतर विवाह करून संसारी बनावे असे लिहीले होते. त्यांच्या लिखाणातून त्यांनी युवकांनी लष्करी शिक्षण घ्यावे व राजकारणाचा अभ्यास करावा असाही प्रचार केला.

अलिपूर बॉम्ब खटल्यातील उपेंद्राचे सहकारी अविनाशचंद्र भट्टाचार्य यांनी " वर्तमान रणनीती " या नांवचे पुस्तक प्रसिद्ध केले होते भट्टाचार्य यांना या खटल्यांत सात वर्षे शिक्षा झाली.

भट्टाचार्य यांच्या या पुस्तकांत त्यांनी स्वातंत्र्य प्राप्तीसाठी आपल्याला ब्रिटीशा बरोबर युद्धच करावे लागेल असे लिहीले होते. हेच पुस्तक पुढे सावरकर व भाई परमानंद यांच्या नाशिक व लाहोर येथील घरांच्या पोलीसांनी झडत्या घेतल्या असताना पोलीसांना मिळाले.

उपेद्रनाथ यांनी लिहीलेले कांही ज्वलंत लेख मुक्ती कौन पाथे ? या पुस्तकांत समाविष्ट करण्यात आले होते. सरकारने या पुस्तकावर व युगांतर प्रकाशनावर बंदी घातली. बंदी हुकूमामुळे युगांतरचे प्रकाशन बंद पडले. अनेक पोलीस अधिकाऱ्यांच्या गुप्त अहवालांत उपेंद्रनाथ हे भयंकर माणूस असा उल्लेख आहे.

उपेंद्रनाथ हे क्रांतिकारकांची प्रेरक शक्ती अशा गौरवपूर्ण शब्दांत योगी अरविंद घोष यांनी त्याच्या विषयी बोलतांना म्हटले आहे.

शाखा
BVBK-0401567
क्र. ९५६८
दि. 31/7/08
विषय